रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक २१७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## अर्थसंकल्पीय अधिवेशनाची तारीख जाहीर

**नवी दिल्ली :** संसदेचे २०२६ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी ते २ एप्रिल या कालावधीत होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन बोलावण्यास मान्यता दिली आहे. यातील पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपणार असून संसद ९ मार्च रोजी पुन्हा भरणार आहे. अर्थपूर्ण वादविवाद आणि लोककेंद्रित प्रशासनाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. तसेच, बहुप्रतिक्षित केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ च्या तारखा देखील अधिकृतपणे जाहीर करण्यात आल्या आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारी रोजी, म्हणजे रविवार केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## इस्त्रोचे दुसऱ्यांदा अपयश

**नवी दिल्ली :** जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थांपैकी एक असलेल्या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला (इस्रो) २०२६ च्या पहिल्याच मोहिमेत मोठा धक्का बसला आहे. इस्रोचे विश्वसनीय रॉकेट, पीएसएलव्ही-सी६२, त्याच्या गंतव्यस्थानावर पोहोचण्यात अपयशी ठरले आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एक शानदार आणि गडगडाट प्रक्षेपण होऊनही, तिसऱ्या टप्प्यात रॉकेटने नियंत्रण गमावले आणि देशाचा महत्त्वाचा गुप्तचर उपग्रह, अन्वेषा आणि इतर १५ लहान उपग्रह अवकाशात पाठवले. २६० टन वजनाचे पीएसएलव्ही-डीएल आवृत्ती सतीश धवन अंतराळ केंद्रावरून सकाळी १० वाजून १७ मिनिटांनी यशस्वीरित्या उड्डाण केले होते.


# राजवट संपणार, निवडणूक रंगणार?

## रायगड जिल्हा परिषद निवडणूकीचा आठवड्यात जाहीर होणार कार्यक्रम

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत हालचालींना वेग आला असून राज्य निवडणूक आयोगाकडून या आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासकीय तयारी अंतिम टप्प्यात असून संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका सुरू असल्याची माहिती खात्रीशीर सुत्रांकडून मिळाली आहे. आरक्षण व कायदेशीर बाबींवर अंतिम स्पष्टता मिळाल्यानंतर तारखा, नामांकन, छाननी आणि मतदानाचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. त्यामुळे राजकीय पक्षांनीही तयारीला गती दिली आहे. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वाढल्याने प्रशासकांची राजवट संपून लोकशाही पुन्हा कार्यरत होणार अशी चिन्हे स्पष्ट होत आहेत. अनेक महिन्यांपासून प्रशासकांच्या हातात असलेली सत्ता आता थेट जनतेच्या हाती जाणार असल्याने राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे.

**रायगड जिल्हा परिषद 59**
**पंचायत समितीच्या 118**
**जागांसाठी निवडणूक**
**जिल्ह्यात 17 लाख 381 मतदार**
**2 हजार 323 मतदान केंद्र**



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका ३१ जानेवारीपर्यंत पुर्ण करण्याचे आदेश यापुर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार, आता यामध्ये मुदतवाढ करण्यात आली असून १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला दिलासा मिळाला आहे.

यापुर्वीच पहिल्या टप्प्यात रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक होणार असल्याचे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले होते. कार्यक्रम जाहीर होताच रायगड जिल्ह्यात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असून निधी वितरण, उद्घाटन कार्यक्रमांवर मर्यादा येणार आहेत.

मागील काही महिन्यांपुर्वी लोकसंख्या वाढ विचारात घेऊन प्रभाग रचना करण्यास सांगितले होते. परंतु, २०२१ मध्ये जनगणना न झाल्याने ती प्रभाग रचना रद्द करून २०११ च्या जनगणनेनुसार प्रभाग रचना करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांमध्ये आरक्षण आहे. तर, इतर २० जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली असल्यामुळे त्याविषयी काय निर्णय होणार, यावर प्रश्नचिन्ह आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या निवडणूका जानेवारीपर्यंत होण्याची शक्यता होती. परंतु, महानगरपालिकेचा कार्यक्रम जाहीर झाला. त्यामुळे या निवडणूका लांबणीवर गेल्या. त्यानंतर ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रीया पुर्ण करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. मात्र, राज्य निवडणूक आयोगाच्या मागणीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या निवडणूका पान २ वर

### रायगड जिल्ह्याचे अध्यक्षपद सर्वसाधारण

रायगड जिल्हा परिषदेवर यापुर्वी शेतकरी कामगार पक्ष २३, शिवसेना १८, राष्ट्रवादी ११, काँग्रेस व भाजप प्रत्येकी ३ असे बलाबल होते. राजिपच्या सदस्यपदांचा कार्यकाळ २२ मार्च २०२२ रोजी संपला. आता कार्यकाळ संपून ३ वर्षे ९ महिने होऊनदेखील जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. तेव्हापासून रायगड जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. जिल्ह्यातील अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण आरक्षण पडले असून जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती अध्यक्ष व सदस्यपदांचे आरक्षणही जाहीर झाले आहे.

### प्रशासकीय यंत्रणा सज्ज

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यासाठी आरक्षण, मतदान यादी, मतदार केंद्र निश्चित झाले आहेत. जिल्ह्यामध्ये १७ लाख ३८१ मतदार आहेत. त्यात ८ लाख ५७ हजार ९ महिला मतदार, ८ लाख ४६ हजार ३४७ पुरुष मतदार अणि २५ इतर मतदारांचा समावेश आहे. या निवडणूकीसाठी जिल्ह्यात २ हजार ३२३ मतदान केंद्र उपलब्ध आहेत. या निवडणुकांसाठी प्रशासकीय तयारी पुर्ण झाली आहे. याबाबत निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकाऱ्यांना पत्रही पाठवण्यात आले आहे. आता निवडणुका जाहिर होण्याची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

## वेधक

### सोने, चांदीने गाठला उच्चांक

**नवी दिल्ली :** भारतीय सराफा बाजारात सोमवारी (दि.१२) सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ पाहायला मिळाली आहे. यावेळी सोन्याचे एका तोळ्याचे दर २,८८३ रुपयांनी महागले आहेत. तर, चांदीच्या दरात एका दिवसात १४,४७५ रुपयांची वाढ झाली आहे. चांदीचा जीएसटीशिवायचा दर २ लाख ५७ हजार २८३ रुपये किलो इतका आहे. जीएसटीसह एक किलो चांदीचा दर २ लाख ६५ हजार १ रुपये किलो आहे. तर, सोन्याचा जीएसटीशिवायचा एका तोळ्याचा दर १ लाख ४० हजार ५ रुपयांवर पोहोचला आहे. जीएसटीसह एक तोळे सोन्याचा दर १ लाख ४४ हजार २०५ रुपयांवर पोहोचला आहे. शुक्रवारी (दि.९) चांदीचे दर २ लाख ४२ हजार ८०८ रुपये किलोवर होते. तर, सोन्याचा दर १ लाख ३७ हजार १२२ रुपये एक तोळा होता. जीएसटीशिवायचा सोन्याच्या दराचा उच्चांक मोडला गेला आहे.

### माजी उपराष्ट्रपतींची प्रकृती बिघडली

**नवी दिल्ली :** देशातून मोठी बातमी समोर आली आहे. देशाचे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. त्यानंतर त्यांना दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्वेदिक विज्ञान संस्था (एम्स) मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जगदीप धनखड हे ७४ वर्षांचे आहेत. त्यांना आरोग्याच्या अनेक समस्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, धनगड हे शनिवारी (दि.१०) दोनदा बाथरूममध्ये बेशुद्ध पडले होते. त्यानंतर त्यांना दिल्लीतील एम्समध्ये दाखस करण्यात आले. आता त्यांच्या काही चाचण्या केल्या जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. जगदीप धनखड यापूर्वी अनेक वेळा बेशुद्ध पडले आहेत.

### नऊ लाख पंधरा हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** एआय ट्रेड या ॲप्लीकेशनमध्ये गुंतवणूक करून बारा ते चौदा टक्के उच्च परताव्याचे आमिष दाखवून ९ लाख १५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका व्यक्ती विरोधात ८ जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपाली अमृतकर या करंजाडे सेक्टर सहा येथे राहत असून त्यांनी सोशल मीडियावर एआय ट्रेडमध्ये गुंतवणूक करून १२ ते १४ टक्के नफा मिळवण्याबाबत जाहिरात पाहिली होती. यावेळी त्यांनी ते ॲप डाऊनलोड केले आणि त्यांचे खाते उघडण्यात आले. त्यांनी सुरुवातीला गुंतवणूक केली. यावेळी ॲपमध्ये गुंतवणुकीचा परतावा दिसत होता. पान २ वर

## उपनगराध्यक्षपदी ॲड. मानसी म्हात्रे



**विरोधकांना केवळ तीन मतांमध्ये समाधान**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीनंतर उपनगराध्यक्षपदाची निवड सोमवारी (दि.१२) पार पडली. या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाच्या ॲड. मानसी म्हात्रे यांना बहुमत मिळाल्याने त्यांची उपनगराध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी जाहीर केले. यावेळी हात उंच करून मतांची प्रक्रीया राबविण्यात आली. यामध्ये ॲड. मानसी म्हात्रे यांना १७ तर विरोधकांना त्यांच्यासहित केवळ तीनच मते मिळाली. यावेळी मानसी म्हात्रे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

अलिबाग पान २ वर

### सर्वांना सोबत घेऊन काम करणार : ॲड. मानसी म्हात्रे



शेकाप नेते जयंत पाटील तसेच शहराने माझ्यावर विश्वास ठेवून पुन्हा उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे. या पदाचा मान राखण्याचे काम कायम करेन. आज माता जिजाऊंचा जन्म दिवस आहे. या दिनानिमित्त संपूर्ण अलिबागकरांना आश्वासीत करते की, नगराध्यक्ष अक्षया नाईक व संपूर्ण टीम असे सर्वांना सोबत घेऊन प्रथम महिला सबलीकरणावर भर देण्याचा प्रयत्न राहणार आहे. नागरी सुविधा देण्याबरोबर शहरातील समस्या सोडविण्याचा प्रयत्न कालखंडात जरूर केले जाईल. शहरातील विकास अधिक मजबूत व्हावा. शहरातील कामे चांगली झाली पाहिजेत, ही भावना ठेवून एकमेकांच्या सोबतीने काम केले जाईल अशी ग्वाही उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिली.

### शुभेच्छांचा वर्षाव

शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष अक्षया नाईक, मुख्याधिकारी सागर साळुंखे, शेकाप तालुका माजी चिटणीस अनिल पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप शेतकरी सभा अध्यक्ष अनिल पाटील, सुशील पाटील, रायगड बाजारचे उपाध्यक्ष प्रमोद घासे, संजना कीर, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

## मजलगावमध्ये शेकापचे अधिवेशन संपन्न

**| माजलगाव | प्रतिनिधी |**



शेतकरी, कामगार आणि कष्टकरी यांच्या प्रश्नावर सातत्याने लढणाऱ्या तसेच मार्क्सवाद आणि सत्यशोधक विचारधारा केंद्रस्थानी ठेवून गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा अधिवेशन माजलगाव येथे रविवारी (दि.११) संपन्न झाले. अधिवेशनाची सुरुवात बळीराजा व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तर, सुरुवातीला शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मणराव गोळेगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी बोलताना बाबासाहेब देवकर यांनी, शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणू शकतो, असा विश्वास व्यक्त केला. तर, उमाकांत राठोड यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करून आपला विचार घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. तसेच, दिगंबर कांबळे यांनी बीड जिल्ह्याला डाव्या विचारांचा खूप मोठा वारसा असल्याचे सांगून क्रांतिसिंह नाना पाटलांचा विचार पुन्हा एकदा बीड जिल्ह्यातील शेतकरी कष्टकऱ्यांच्या घराघरात पोहोचविण्याचे आवाहन केले. त्यानंतर विष्णुपंत घोलप यांनी शेतकरी कामगार पक्ष एकजुटीने काम करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमकपणे लढा उभारण्याचा विश्वास दिला. तर, भाई मोहन गुंड यांनी पुन्हा एकदा बीड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला करण्यासाठी कामाला लागण्याची आव्हान केले.

अधिवेशनाच्या शेवटी एकमताने कार्यकारणी निवडण्यात आली. त्यात जिल्हा चिटणीसपदी ॲड.नारायण गोले पाटील (पुर्व), बापुसाहेब साळुंके (पश्चिम), तर संघटकपदी धनंजय मुळे, खजिनदार अशोक पान २ वर

## ताम्हिणी घाटात सापडला मृतदेह

### ■ दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

ताम्हिणी घाटात रविवारी (दि.११) एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. माणगाव पोलिसांना सुरुवातीलाच घातपात असल्याचा संशय आल्याने त्या दृष्टीने तपास करत याप्रकरणी दोघांना अटक केली आहे.

माणगाव तालुक्यातील पुणे-दिघी महामार्गावर असलेल्या ताम्हिणी घाटातील सणसवाडी गावानजिक सीक्रेट पॉईंटजवळ रविवारी (दि.११) एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. फिर्यादी हे कामानिमित्त त्या ठिकाणी गेले असता ३० वर्षे, वयोगटातील पुरुष निपचिप पडलेला दिसून आला. त्यांनी तात्काळ माणगाव पोलिसांना संपर्क साधला. त्यावेळी मृत व्यक्तीच्या अंगावर, डाव्या बाजुच्या खांद्याच्या खाली, गळ्याला व डोक्याला जखमा झालेल्या दिसल्या. तसेच, जमिनीवर सुखलेल्या रक्ताचे डाग दिसले. परंतु, या व्यक्तीची ओळख पटत नव्हती. या मृत व्यक्तीच्या अंगावरील खुणा पाहून घातपात असल्याचा संशय माणगाव पोलिसांनी आला. त्यानुसार माणगाव पोलिसांनी शोध घेऊन पुणे येथून आरोपी अनिकेत महेश वाघमारे (२६) आणि तुषार उर्फ सोन्या शरद पाटोळे (२४) यांना अटक केली आहे. घटनेचा पुढील तपास माणगाव पोलीस करत आहेत.

## मुरूडमध्ये दोन घरांमध्ये आग

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**




मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत भागातील खारीकवाडा परिसरात सोमवारी (दि.१२) सकाळी १० वाजता आग लागल्याने दोन घरांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

खारीकवाडा परिसरातील रमेश पाटील यांच्या पत्नी मंदा पाटील यांनी सकाळी घरातील देवासमोर दिवा लावून परिसरातील मंदिरात गेल्या होत्या. यादरम्यान, सकाळी दहा वाजता दिव्याची आग वाढत जाऊन ती छप्पर पर्यंत पोहचली. या आगीचा भडका उठून रमेश पाटील यांच्या घरालगत असणाऱ्या प्रभाकर पाटील यांच्या घराला देखील आग लागली. यावेळी दोन्ही घरातील माणसे बाहेर असल्याने ही बाब पटकन लक्षात आली नाही. कौलातून धूर येऊ लागल्याने असंख्य मदतीचे हात धावून आले. यावेळी आगरी समाज खारीकवाडा, परीट समाज, मुस्लिम समाज तसेच श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर येथील शाळेतील विद्यार्थी व शिक्षक सुद्धा आग विझविण्यासाठी धावून आले. त्यांनी तातडीने दखल घेतल्याने ही आग आटोक्यात आली. यादरम्यान, मुरुड नगरपरिषद अग्निशामक दल देखील घटनास्थळी दाखल झाले होते. परंतु, त्या आधीच आग विझविण्यात आली होती. या आगीमध्ये कपडे, भांडी, महत्वाची कागदपत्रे व लाकडी कपाटे जळून खाक झाली आहेत.

## गैरहजर कर्मचाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत गैरहजर राहिलेल्या एकूण ६ हजार ८७१ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यावेळी २ हजार ३५० अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. तर, वारंवार सूचना देऊनही प्रशिक्षण, प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया अथवा नेमून दिलेल्या निवडणूक कर्तव्यांस हजर न राहणाऱ्या ४ हजार ५२१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सोमवार दि.१२ जानेवारीपासून पोलीस कारवाई केली जाणार आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या निर्देशानुसार कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महानगरपालिका मुख्यालयात रविवारी (दि.११) बैठक पार पडली. बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने गुरुवारी (दि.१५) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मतदान प्रक्रियेविषयीचे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले. निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक होते. तथापि, ते अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण सत्रास गैरहजर राहिले आहेत.

**श्वान पथकाची दमदार कामगिरी | अंमली पदार्थ तस्करीसह वेगवेगळ्या गुन्ह्याची उकल**

# डॉग स्कॉड गुन्हेगारांचे कर्दनकाळ

प्रमोद जाधव

**| रायगड |**

आधूनिक युगामध्ये कोणतीही माहिती हवी असल्यास गुगलवर सर्च करून आपण माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतो. मात्र, रायगड पोलीस दलातील श्वान पथकाने या वर्षात दमदार कामगिरी करीत अंमली पदार्थ तस्करीसह अपहरण व अन्य गुन्ह्यांची उकल केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे डॉग स्कॉड गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरले आहेत. अगदी कमी वेळेत गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांची माहिती पोलिसांना देण्याचे काम केले आहे.



रायगड पोलीस दलातील पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्यात आठ पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय, २८ पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा, तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आहेत. जिल्ह्यात २ हजार ३०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. जिल्ह्यातील गुन्हेगारीसह गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याचे काम रायगड पोलीसांमार्फत कायमच केले जाते. अपहरण, चोरी, घरफोडी, खून अशा अनेक प्रकारच्या गुन्हे रायगड पोलीस उघडकीस आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करतात. जिल्ह्यासह राज्यातील व राज्याबाहेरील टोळीला जेरबंद करण्याचे कामही पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.


पोलिसांच्या मदतीसाठी रायगड पोलीस दलात डॉग स्कॉड ही एक स्वतंत्र यंत्रणा आहे. या पथकामार्फत पान २ वर

### कायदा, सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न

जिल्ह्यात गुन्हेगारींच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्यामुळे यावर पायबंद आणण्यासाठी रायगड पोलिसांच्या मदतीसाठी दलात डॉग स्कॉड ही स्वतंत्र यंत्रणा सामील करण्यात आली आहे. त्यातून कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## महाराष्ट्राला तीव्र थंडीचा इशारा

**| मुंबई | प्रतिनिधी |**



भारतीय हवामान खात्याने १२ जानेवारीला राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्लीसह हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि ईशान्य भारतात तीव्र थंडीचा इशारा जारी केला होता. उत्तरेकडून अतिवेगाने सरकणाऱ्या शीतलहरींमुळे देशभरात थंडीचा कडाका वाढत आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातही थंडीचा प्रभाव वाढला आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये किमान तापमानात लक्षणीय घट नोंदवली गेली असून, विशेषतः उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात शीतलहरींसदृश स्थिती निर्माण झाली आहे. पुणे, सातारा, कोल्हापूरसह घाटमाथ्यावरील भागांमध्ये पहाटे दाट धुक्याची शक्यता असून, यामुळे दृश्यमानतेवर परिणाम होऊ शकतो. कोकण किनारपट्टी आणि अंतर्गत महाराष्ट्रात कमाल व किमान तापमानात सरासरी दोन ते तीन अंश सेल्सिअसचा चढ-उतार अपेक्षित असला, तरी संपूर्ण आठवडा थंडीत जाण्याचा प्राथमिक अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे या भागांत प्रवास करणाऱ्या पर्यटकांनी आणि स्थानिक नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ओडिशात विमानाचा अपघात

**| ओडिशा | वृत्तसंस्था |**

ओडिशातील राउरकेला येथून एका भीषण अपघाताची घटना घडली आहे. भुवनेश्वरहून राउरकेलाला जाणारे विमान कोसळले आहे. राउरकेलापासून सुमारे १० ते १५ किलोमीटर अंतरावर हे विमान कोसळल्याचे वृत्त आहे. हे विमान ९ आसनी होते. अपघात झाला तेव्हा याव विमानात ६ प्रवासी आणि एक पायलट होता. या अपघातात सर्वजण जखमी झाल्याची माहिती आहे. सर्व जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघात नेमका कशामुळे झाला याबाबतची अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही. घटनेची माहिती मिळताच सर्वत्र एकच खळबळ उडाली.

## पान १ वरून

## राजवट संपणार, निवडणूक रंगणार?

घेण्यासाठी मूदतवाढ देण्यात आली. सोमवारी (दि.१२) झालेल्या सुनावणीत १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणूका पुर्ण करण्याचे आदेश सवोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला दिलासा मिळाला आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या निवडणुका शासन कधी घेणार, याकडे वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे डोळे लागून राहिले आहेत. अखेर ही उत्कंठा आता संपण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे आठवड्याभरात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. प्रदिर्घ कालावधीनंतर रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्ते बैठकीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी कामाला लागले आहेत.

## मजलगावमध्ये शेकापचे अधिवेशन संपन्न

रोडे, माऊली जाधव, परळी मुंजा पांचाळ, माजलगाव राहुल सोळंके, माजलगाव अनिल कदम, वडवणी नवनाथ जाधव, आंबेजोगाई महिला आघाडीच्या समन्वयक शिवकन्या मोहन गुंड व तेजस्विनी उबाळे यांची निवड करण्यात आली. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी विष्णुपंत घोलप, प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेकापचे सहचिटणीस बाबासाहेब देवकर, पाहुणे म्हणून कार्यालयीन सहचिटणीस प्रा. डॉ. उमाकांत राठोड, शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रा.डॉ. चंद्रकांत चव्हाण, रस्ते महामार्ग बाधित शेतकरी कामगार आघाडीचे राज्याध्यक्ष दिगांबर कांबळे, राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य मोहन गुंड, मध्यवर्ती समिती सदस्य शिवाजीराव सुरवसे व इम्रान शेख यांची उपस्थिती होती.

## उपनगराध्यक्षपदी ॲड. मानसी म्हात्रे

नगरपरिषदेचे निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणूकीत महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवार अक्षया नाईक या बहुमतांनी निवडून आल्या. तसेच, नगरसेवकपदाच्या २० जागांपैकी १७ जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आले. पुन्हा एकदा अलिबाग नगरपरिषदेवर शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकला. नुकतीच नगराध्यक्षपदाची धुरा अक्षया नाईक यांनी हाती घेतली. सोमवारी (दि.१२) उपनगराध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रीया अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात पार पडली. यावेळी शेकापच्या ॲड. मानसी म्हात्रे, तर भाजपचे ॲड. अंकीत बंगेरा यांनी उपनगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला होता. एक जागेसाठी दोन अर्ज दाखल झाल्यामुळे निवडणूक घेण्यात आली. यावेळी हात उंच करून मतांची प्रक्रीया मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी राबविली. यामध्ये ॲड. मानसी म्हात्रे यांना १७ मते मिळाली. तर, भाजपचे बंगेरा यांना केवल तीनच मतांनी समाधान मानावे लागले. त्यामुळे अंकीत बंगेरा यांचा या निवडणूकीत दारूण पराभव झाला असून ॲड. मानसी म्हात्रे प्रचंड मतांनी विजयी झाल्या. त्यांची उपनगराध्यक्ष म्हणून बहुमतांनी निवड झाल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी अलिबागच्या नगराध्यक्ष अक्षया नाईक, गट नेते तथा नगरसेवक प्रशांत नाईक, ॲड. निलम हजारे, अनिल चोपडा, संध्या पालवणकर, सुषमा पाटील, डॉ. साक्षी पाटील, आनंद पाटील, निवेदिता वाघमारे, समीर ठाकूर, ऋषीकेश माळी, ॲड. अश्वीनी ठोसर, योजना पाटील, सागर भगत, शैला भगत, वृषाली भगत, संतोष गुरव, प्रदिप नाईक आदी उपस्थित होते. नगरसेवक म्हणून सलग तिसऱ्यांदा निवडून आलेल्या ॲड. मानसी म्हात्रे यांनी यापूर्वी उपनगराध्यक्ष म्हणून भुमिका सांभाळली आहे. सलग दुसऱ्यांदा उपनगराध्यक्ष म्हणून त्या निवडून आल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात आले.

**नगरसेवकपदी प्रदिप नाईक, जमाल सय्यद**

सोमवारी झालेल्या निवडीनंतर स्विकृत नगरसेवक म्हणून शेकापच्या दोन जणांची निवड करण्यात आली. त्यामध्ये प्रदिप कृष्णाजी नाईक व जमाल युसूफ सय्यद यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्ष अक्षया नाईक, गटनेते तथा नगरसेवक प्रशांत नाईक यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यापुर्वीदेखील प्रदिप नाईक अलिबाग नगरपरिषदेचे नगरसेवक होते.

## डॉग स्कॉड गुन्हेगारांचे कर्दनकाळ

गुन्हेगारांचा शोध घेण्याचे काम केले जाते. रायगड पोलीस दलात मर्फी, ऑस्कर, रॉकी, रुफस नावाचे श्वान आहे. एखादी घटना घडल्यावर या श्वान पथकाद्वारे गुन्ह्याची माहिती घेण्याचे काम केले जाते. जिल्ह्यात पेण, पोयनाड, पाली, रेवदंडा, मूरूड, अलिबाग या पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीसह अंमली पदार्थांची तस्करीचे गुन्हे दाखल झाले होते. श्वान पथकातील मर्फी, ऑस्कर, रॉकी, रुफस यांनी आपल्या शैलीने या गुन्ह्यांची उकल काही तासांमध्येच केली. एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यास या पथकाला यश आले असून डॉग स्कॉड गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरले आहेत.

## नऊ लाख पंधरा हजारांची फसवणूक

सुरुवातीला पैसे काढून खात्री केली आणि त्यांचे पैसे बँक खात्यामध्ये जमा झाले. त्यामुळे त्यांनी पती सचिन अमृतकर, सासु शिलाबाई वाणी यांचे देखील अकाउंट सुरू करून गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. तिघांचे मिळून त्यांनी एकूण ९ लाख १५ हजार ६४५ रुपये गुंतवले. त्यांनी ॲप्लीकेशन वर विड्रॉल रिक्वेस्ट टाकली. मात्र, पैसे विड्रॉल करता येणार नाहीत असे सांगण्यात आले. तसेच, संबंधितांचे मोबाईल नंबर बंद आढळले. त्यावेळी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी गुन्हा दाखल केला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे चिंचोटी ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ८८/१/अ, क्षेत्र ०५३४० हे. आर., पो. ख. ०-०७-८० हे. आर. एकूण क्षेत्र ०-६१-२० हे. आर., आकार १२.०० रू. पैसे ही मिळकत, (तदनंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मधुकर कमळाकर पाटील रा. ३३४/१८अ वीर भारती निवास, हॉल विलेज रोड, खोटारी ज्वेलर्स जवळ, जुना कुर्ला पश्चिम मुंबई ४०००७० २) प्रिया प्रकाश पाटील ३) प्रतिक्षा प्रकाश पाटील नं २ व ३ रा. ३३४/२, जॉकीम लोपेझ चाळ, हॉल विलेज रोड, खोटारी ज्वेलर्स जवळ, जुना कुर्ला पश्चिम मुंबई ४०००७० ४) अक्षता रोहित दिघे पुर्वाश्रमीची अक्षता प्रकाश पाटील रा. रूम नं. ५, दिघे चाळ, साईनाथ नगर रोड, हनुमान मंदिर जवळ, घाटकोपर, पश्चिम, मुंबई ४०००८६ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
तारीख : १२/०१/२०२६ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर निविदा
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**
**ता.माणगांव जि.रायगड**
दि.१२/०१/२०१६

१५ वा आयोग अंतर्गत विकासकामांची व साहित्याची निविदा खालीलप्रमाणे

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.पं.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | कचरा संकलनासाठी सोय करणे | ५२०६८/- | २००/- | ५२०/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| २) | पाणसई नदीतील गाळ काढणे | ६१८२०/- | २००/- | ६१८/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ३) | देऊळवाडी आदिवासीवाडी रस्ता करणे | ५३०८४/- | २००/- | ५३०/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ४) | पाणसई आदिवासीवाडी पाणी योजना दुरुस्त करणे | ७५९०८/- | २००/- | ७५९/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ५) | मुठवली तर्फे निजामपूर नदीतील गाळ काढणे | ६९५८७/- | २००/- | ६९५/- | २०/०१/२०१६ साय.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ६) | पाणसई तलावातील गाळ काढणे | ६९५८०/- | २००/- | ६९५/- | २०/०१/२०१६ साय.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ७) | भिनाड विहीर दुरुस्ती करणे | ६००००/- | २००/- | ६००/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ८) | करंजेवाडी येथे पिण्याच्या पाण्याचा आड दुरुस्त करणे | ७९१७४/- | २००/- | ७९१/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |
| ९) | पाणसई आदिवासीवाडी पाणी योजना दुरुस्त करणे | ७५९०८/- | २००/- | ७५९/- | २०/०१/२०१६ सायं.६.१५वा | दि २१/०१/२०१६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :**
१) सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत पाणसई येथे कार्यालयीन वेळेत मिळेल
२) निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३) उपलब्ध निधीनुसार देयक आदा करणेत येईल
४) निविदा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई ता. माणगाव जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात
५) देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६) अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही
७) ठेकेदारांनी वर्क ओर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/- **ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**
सही/- **सरपंच/प्रशासक ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**

### जाहीर निविदा
नोटीस बोर्ड प्रसिद्धी १०/०१/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. ता-माणगांव, जि-रायगड यांजकडून सन २०२५/२६ वर्षाकरिता १५ वा वित्त आयोग/ग्रा.पं. फंड योजनांतर्गत खालील कामांच्या/साहित्य पुरवठ्याच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फार्म फी | १% इसारा निविदा | निविदा मिळणेची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पळसगाव बु. आदिवासीवाडी येथील घोगरेकर वाडी येथे सामाजिक सभागृह चौथरा बांधणे. | ग्रा.प फंड (मागासवर्गीय खर्च) | ७००००/- | २००/- | ७००/- | १६/०१/२०२६ | १९/०१/२०२६ | ३ महिने |
| २ | मौजे पळसगाव बु. आदिवासीवाडी घोगारेकरवाडी, हिलमवाडी व मौजे पळसगाव बु., रोहीदासवाडी ते वाघजाई मंदिर विद्युत खांबावरून वायर ओढणे. | ग्रा.प फंड (मागासवर्गीय खर्च ) | ४००००/- | २००/- | ४००/- | १६/०१/२०२६ | १९/०१/२०२६ | ३ महिने |
| ३ | ग्रामपंचायत कार्यालया करिता संगणक खरेदी करणे. | ग्रा.प फंड | ५००००/- | --/ | --/ | १६/०१/२०२६ | १९/०१/२०२६ | १५ दिवस |

**अटी व शर्ती १)** निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. १६/०१/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/ चलन जोडलेली असावी.४)कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील.६)निविदा मंजुरीअंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील १०)ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

सही/-
**श्रीम. ऋतुजा बा. साळुंखे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत, पळसगाव बु.**
**ता. माणगाव जि. रायगड**

सही/-
**सोनाली नि.आंब्रे**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगांव बु.**
**ता. माणगाव जि. रायगड**

## राजमाता जिजाऊंचा जन्मोत्सव पाचाडमध्ये साजरा

**महाड :** राजमाता जिजाऊ माँ साहेबांचा ४२७ वा जन्मोत्सव पाचाड येथे साजरा करण्यात आला. यावेळी जिजामातेच्या समाधी स्थळी पूजन करून जिजामातेच्या कार्याचा जयघोष करण्यात आला. याठिकाणी नवयुग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझिम नृत्य सादर केले. तर, ऋचिता घागरे या विद्यार्थिनीने राजमाता जिजाऊंच्या जीवनावरील एकपात्री प्रयोग सादर केला. या कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बडे साहेब, तहसीलदार महेश शितोळे, महाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंखे, सरपंच सीमा बेंदुगडे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की आमच्या अशिलाने मौजे श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | बागायत क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १) | १८३/१ | ०-१२-९० | ०-१२-७० | ०-०-२० | १-३१ |

जमीन मालकाचे नाव :- श्री. दिलीप नारायण केळस्कर

यांचा अविभाज्य हिस्सा त्यांच्याकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याच्या बोलीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याबाबत मिळकत मालकाचे म्हणणे असून ती त्याच्या आजपर्यंत ताबे कब्जा व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणूकी खाली आहे. सदर जमीन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधित सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी, वहिवाट ताबा बयाना पावती अखत्यारपत्र, साठे करार गहाण बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लीन, बक्षिशी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमूद मिळकतीच्या हद्दी खुणावरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाची आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने ) खाली सही करणारे वकील यांच्याकडे पाठवावे वकिलाची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजा विरहित आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतीही हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमच्याशी संबंधित मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- :- १२/०१/२०२६ सही/-
कार्यालयीन पत्ता **(ॲड. संतोष मारुती सापते)**
रा. ग स. कातकर सभागृह गाळा नं २ वाणी श्रीवर्धन

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे निगडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र. २ एकूण क्षेत्र ०१-०१-३०, आकार २१.२५ लागवड - गवतपड, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुमेल अ. सलाम चरफरे, श्री. सुहेल अ. सलाम चरफरे, तसनीम अजीम बीजापुरी सर्व राहणार मु.पो. निगडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत देणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांनी तिऱ्हाईत व्यक्तींसोबत केलेली आहेत. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्युपत्रांकित दान, जप्ती लीन, लीज, बक्षिसी ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधितांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार विक्रीदाराचे वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक १२/०१/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S.LL.B
विक्रीदाराचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे खालील नमुद केलेले विद्यमान मालक असून सदर खालील नमूद केलेल्या मिळकती कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी विद्यमान मालक यांच्या बरोबर व्यवहार ठरविलेला आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार रविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | विद्यमान मालकाचे नांव | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| मौजे नागाव, ता. अलिबाग | १) श्री. मधुकर काशिनाथ बिरजे २) श्री. भालचंद्र काशिनाथ बिरजे | ७८३ | ०-१२-०० | १-७५ |
| | श्री. राजीव गजानन शेटये | ७८१ | ०-०६-३० | ०-९१ |
| | श्री. राजीव गजानन शेटये | ७८५ | ०-०७-९० | ०-९५ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरबाबत कसलाही हक हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग, सही/-
दि. १२-०१-२०२६. **ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रभाकर नथु शेळके, रा. किरवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-भिसेगाव, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड**

| जमीन मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. प्रति | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| चेतन चंपकलाल देसाई | ५२/अ/१/अ | ००-६६-०० पो.ख. ००-१६-०० ००-८२.०० | ० रू ४४ पैसे |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क व कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसो आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १२/०१/२०२६ सही/-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी.) मुंबई हायकोर्ट
ऑफिस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २५६/५, एकूण क्षेत्र ०-०४-०० हे. आर., आकार ०.९४ रू.पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पद्माकर अनंत डोंगरे रा. मु. पो. ता. पेण, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १२/०१/२०२६ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे चिंचोटी ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ८८/१/क, क्षेत्र ०-४२-२० हे. आर., पो. ख. ०-०६-४० हे. आर., एकूण क्षेत्र ०-४८-६० हे. आर., आकार ९.५६ रू. पैसे ही मिळकत ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लक्ष्मण गणपत पाटील रा. मु. चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १२/०१/२०२६ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| विनोद सुरेश भगत | २१ | ३/क | ०-५४-७० | ९.४५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १३/०१/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सतेज बाळकृष्ण नाईक रा. बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलकडे ता.अलिबाग | २५७ | ०-०६-६० पो.ख. ०-०३-०० एकूण ०-०९-६० | १.५६ |

सबब सदरहू भातशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहितआहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०१/२०२६ सही /-
**ॲड. नेहा विलास तांबट**
जिल्हा न्यायालय,
ता.अलिबाग, जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती त्यांचे मालक श्री. प्रशांत गंगाधर जाधव यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४२ | २ | ०-१०-०० | ०-०९ |
| ४२ | ३ | ०-०३-०० | ०-०५ |

तरी वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०१/२०२६ **ॲड. तुषार रामचंद भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

## निवडक

### न.प.ची सर्वसाधारण सभा १४ जानेवारीला

**उरण :** उरण नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदेची प्रथम सर्वसाधारण सभा बुधवारी (दि.१४) सकाळी १०:३० वाजता नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेत उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक, नामनिर्देशित नगरसेवकांची नियुक्ती तसेच विविध सभापती पदांवरील निवडणुका होणार आहेत.सध्याच्या राजकीय समीकरणांनुसार नगराध्यक्ष व ९ नगरसेवक महाविकास आघाडीकडे, तर भाजपकडे १२ नगरसेवकांचे संख्याबळ आहे. त्यामुळे उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक झाल्यास दोन्ही गटांत चुरशीची रस्सीखेच होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, महाविकास आघाडी व भाजपचे नगरसेवक आपापल्या गटात एकसंघ राहिल्यास निवडणूक एकतर्फी ठरण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. दरम्यान, भाजपकडून उपनगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष रवी भोईर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे भाजपच्या नगरसेवकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे भाजपकडील उमेदवार निश्चित झाल्याचे चित्र स्पष्ट होत असून, महाविकास आघाडी कोणता डाव खेळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपनगराध्यक्षपदासाठी बुधवार, १४ जानेवारी रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १२:३० या वेळेत नामनिर्देशन अर्ज स्वीकारले जाणार असून, दुपारी १२:३० ते १२:४५ या वेळेत अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. त्यानंतर १५ मिनिटांत अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण होऊन, आवश्यकतेनुसार दुपारी १ वाजता प्रत्यक्ष निवडणूक होणार आहे. उपनगराध्यक्ष पदासोबतच विविध सभापती पदांच्या निवडणुकांकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, या निवडणुकांमुळे उरण नगरपरिषदेतील आगामी सत्ता समीकरणे निश्चित होणार असल्याचे मानले जात आहे.

### आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत उरणच्या विद्यार्थ्यांचा दबदबा



**उरण :** उरण स्मार्ट किड्स ॲनुकाम लर्निंग प्रा. लि. यांच्या वतीने पुणे येथे आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत उरण येथील मास्टर ब्रेन डेव्हलपर्स संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यशाची पताका फडकावली. या स्पर्धेत भारतातील विविध राज्यांसह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधून सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. उरण शहरात सन २००७ पासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या मास्टर ब्रेन डेव्हलपर्स संस्थेच्या २० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत तेजल पाटील, रुग्वेद म्हात्रे, सनिश मोकळ, वरद काळभोर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिके पटकावली. तसेच तेजश्री वारीठ, रुग्वेद म्हात्रे, स्वना साळुंखे, सुरेखा म्हात्रे या विद्यार्थ्यांनी अबॅकसमधील ग्रॅज्युएशन पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे संस्थेच्या प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत ठरली आहे. या यशामुळे उरणच्या शैक्षणिक गुणवत्तेचा नावलौकिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढला आहे.

# श्रीवर्धन किनाऱ्यावर शुकशुकाट

## ।। सुट्ट्यांचा हंगाम संपला ।। हॉटेल व्यवसायिकांवर मंदीचे सावट



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**मागील वर्षी १४ मे लाच पावसाळा सुरू झाल्यामुळे पर्यटन व्यवसायिकांचा जवळजवळ एक महिना फुकट गेला होता. तर यावर्षी पावसाळा देखील एक महिना लांबल्याने पर्यटकांचा पर्यटन व्यवसाय एक महिना उशीरा सुरू झाला. दिवाळीची सुट्टी नंतर नाताळची सुट्टी या काळामध्ये शाळांना सुट्ट्या असल्यामुळे पर्यटक श्रीवर्धन परिसरात खूप मोठ्या प्रमाणावर येत होते. श्रीवर्धन शहरातील व तालुक्यातील बहुतेक हॉटेल व रिसॉर्ट्स हाउसफुल्ल असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. परंतु आत्ता सुट्ट्यांचा हंगाम संपला आहे. पुढच्याच महिन्यात दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू होतील. त्यामुळे आता पर्यटकांचा ओघ फक्त शनिवार आणि रविवार या दोनच दिवशी असणार आहे.**

शनिवार आणि रविवार दोन दिवस संपूर्ण श्रीवर्धन समुद्रकिनारा पर्यटकांनी फुललेला होता. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर असलेले बोटिंग व्यावसायिक, त्याचप्रमाणे इतर व्यवसाय करणारे यांच्याकडे तुफान गर्दी होती. परंतु आज सोमवारी सकाळी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारला असता, समुद्रकिनारी पूर्णपणे शुकशुकाट असल्याचे पाहायला मिळाले. आता पर्यटकांची संख्या वाढेल ती २४, २५ व २६ जानेवारी रोजी कारण सोमवारी २६ तारखेला सुट्टी असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारा आणि श्रीवर्धन शहरातील हॉटेल्स पर्यटकांनी भरून जाणार आहेत. मात्र मधले दिवस हे पर्यटन व्यवसायिकांसाठी मंदीचे दिवस असणार आहेत.

श्रीवर्धन शहरांमध्ये शाळांच्या व महाविद्यालयांच्या सहली देखील मोठ्या प्रमाणात येतात. परंतु त्याचा फायदा या ठिकाणाच्या हॉटेल व्यवसायिकांना होत नाही. कारण सहलींचे आयोजक जेवण बनवण्याचे सर्व साहित्य व आचारी सोबत आणत असल्यामुळे समुद्रकिनारी किंवा मठाचा गवंड परिसरात सदर सहलींचे आयोजक उघड्यावर अन्न शिजवतात व त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना जेवण वाढतात. त्यामुळे हा परिसर देखील अस्वच्छ होतो. यावरती श्रीवर्धन नगरपरिषदेने कारवाई करणे आवश्यक आहे. कोणतेही पर्यटक श्रीवर्धन शहरात उघड्यावर अन्न शिजवताना आढळून आले. तर त्यांच्यावरती दंडात्मक कारवाई झाली तरच या प्रकाराला आळा बसणार आहे.

जेणेकरून शहरातील हॉटेल व्यवसायिकांना येणाऱ्या सहलीं पासून आर्थिक उत्पन्न मिळेल. श्रीवर्धन समुद्रकिनारी पोलिसांनी पार्किंगची तात्पुरती व्यवस्था करून घेतली असली तरी, भविष्यात श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून पे अँड पार्क न केल्यास श्रीवर्धन समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना पार्किंगची समस्या भेडसावणार आहे. तरी श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी तातडीने पार्किंगच्या व्यवस्थेकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# शेकापचा इलेक्ट्रॉनिक प्रीपेड मीटर विरोधात एल्गार



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुका शेतकरी कामगार पक्षातर्फे इलेक्ट्रॉनिक मीटर प्रीपेड विरोधात तालुका चिटणीस रवी घरत, ज्येष्ठ नेते काका पाटील यांच्या नेतृत्वाखाली एमएसईबीला जाब विचारण्यात आला.

अदानी कंपनीचे घरटी मीटर लावण्याचे एमएसईबीने बंद करावे. यावेळी तालुका चिटणीस रवी घरत यांनी सांगितले की, आमची लढाई इलेक्ट्रॉनिक मीटर प्रीपेड विरोधात आहे. या कंपनीचे मीटर बसविण्यात आमचा विरोध आहे. यासाठी आम्ही आज शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून आपल्या कार्यालयात धडक दिली आहे. यावेळी ज्येष्ठ नेते काका पाटील म्हणाले, अदानी कंपनीचे प्रीपेड मीटर भविष्यात घातक असून त्यामुळे सर्व सामान्य ग्राहकांचे हक्क हिरावून घेतले जातील. यामुळे शेतकरी कामगार पक्षाचा या प्रीपेड मीटरला सक्त विरोध आहे. यावेळी पंचायत समितीचे सदस्य महेश म्हात्रे, माजी उपसभपती म हादेव बंडा, अनंत घरत व प्रमुख कार्यकर्ते हजर होते. यावेळी रवी घरत यांनी एमएसईबीचे अधिकारी गायकवाड यांना निवेदन सादर करण्यात आले. जर इलेक्ट्रॉनिक मीटर लावणे बंद केले नाही तर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आंदोलन, मोर्चा, घेराव सारख्या संविधानिक मार्गाचा अवलंब केला जाईल, असे चिटणीस रवी घरत यांनी एमएसईबी अधिकाऱ्यांना सांगितले.

# परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या बॅगेतील सोने लंपास

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

परीक्षा सुरु असल्याने कल्याण येथून कर्जत तालुक्यात एका महाविद्यालयात विद्यार्थी आले होते. नर्सिंग विद्यार्थ्यांच्या बॅगेतील सोन्याच्या वस्तू गहाळ झाल्याची घटना घडली.त्यानंतर तपास केल्यावर कॉलेजमधील महिला कर्मचाऱ्याने त्या वस्तू चोरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कर्जत पोलिसांनी तत्काळ तपास करत आरोपी महिलेला अटक केली आहे.

कल्याण येथील रहिवासी असलेला अथर्व देवानंद कुलसंगे हा विद्यार्थी आणि त्याच्या सोबत एक विद्यार्थीनी हे दोघे नर्सिंग परीक्षेसाठी कर्जत येथे आले होते. परीक्षा सुरू होण्यापूर्वी वर्गातील शिक्षकांनी गळ्यातील मौल्यवान वस्तू काढून बॅगेत ठेवा अशी सूचना केली होती. त्यानुसार अथर्वने त्याची एक तोळ्याची सोन्याची चैन आणि विद्यार्थिनीने पाच ग्रॅमची सोन्याची चैन आपापल्या बॅगेत ठेवली. परीक्षा संपल्यानंतर बॅग तपासली असता दोघांचेही सोने गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ कॉलेज प्रशासनाशी संपर्क साधला. मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस दाद देण्यात आली नाही. सहकार्य न मिळाल्याने अखेर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

फिर्यादीच्या तक्रारीनंतर कर्जत पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. पोलीस पथकाने कॉलेजमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक महिला कर्मचारी विद्यार्थ्यांची बॅग उचलून नेऊन त्यातील सोने काढून घेतल्याचे आणि अवघ्या पाच मिनिटांत तीच बॅग पुन्हा त्या ठिकाणी ठेवत असल्याचे स्पष्ट दिसून आले.

### पनवेल रेल्वे स्थानकातील भुयारी मार्ग पुन्हा सुरू

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकात चाकरमान्यांसह लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. पनवेलकडे जाण्यासाठी एकाच उड्डाणपुलावर अवलंबून राहावे लागत असल्याने संभाव्य अनुचित प्रसंग टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अखेर स्थानकातील भुयारी मार्ग पुन्हा सुरू केला आहे. या निर्णयामुळे नवीन पनवेलकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाला असून, प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, प्रत्यक्षात भुयारी मार्गातून मोठ्या प्रमाणावर सामान घेऊन जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जड बॅगा, ट्रॉली तसेच अपुऱ्या सुविधांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. स्थानकात लिफ्ट, रॅम्प किंवा स्वतंत्र व्यवस्था नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग प्रवाशांचे विशेष हाल होत आहेत.

# भरपाईचा अडथळा दूर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दिर्घकाळ रखडलेली विमा नुकसान भरपाई आता रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. त्यामुळे विमा भरपाई न मिळण्याचा अडथळा आता दूर झाला असून शेतकऱ्यांना विमा दोन दिवसात जमा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जागतीक हवामानाचा फटका रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बसला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र शेतकऱ्यांना आंबा फळपिक विमा मिळत नसल्याची माहिती आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या निर्दर्शनास आणून दिली.

**जिल्ह्यातील हजारो आंबा शेतकऱ्यांना मिळणार विमा**

**महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे चंद्रकांत मोकल यांचा पाठपुरावा**



वेगवेगळ्या बैठकांच्या माध्यमातून प्रशासनाच्या ही बाब निर्दर्शनास आणून दिली. जिल्ह्यातील पाच हजार २३५ शेतकऱ्यांनी तीन हजार ९८१ हेक्टर क्षेत्रासाठी विमा उतरविला होता. या शेतकऱ्यांना सात कोटी रुपये नुकसान भरपाई मंजूर झाली होती. यापैकी पाच कोटी रुपये डिसेंबर अखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली. परंतू रोहा, तळा, पनवेल, खालापूर या तालुक्यातील अनेक शेतकरी विमा रकमेपासून वंचित राहिले होते. सॉम्पो इन्शूरन्स कंपनीकडून पैसे देण्यास टाळाटाळ झाली होती. ही गंभीर बाब चंद्रकांत मोकल यांनी राज्याचे कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या निर्दर्शना आणून दिली.

त्यांना पत्र देऊन माहिती देण्यात आली. याची दखल तात्काळ घेऊन विमा भरपाई तात्काळ देण्याचे आदेश मांढरे यांनी मुख्य सांख्यिकी प्रमोद सावंत यांना दिले. कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांना सुचना सावंत यांनी दिल्यावर कार्यवाही जोरात सूरू झाली. दोन दिवसांमध्ये खात्यात पैसे जमा होणार असे लेखी पत्र कंपनीने दिले असल्याची माहिती आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली.

# रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामांचे भूमिपूजन

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण तालुक्यातील करंजा समुद्रकिनारी बाबदेव पाडा ते कासवलेपाडा या रस्त्यांच्या काँक्रिटीकरण कामांचे भूमिपूजन शनिवारी (दि.११) करण्यात आले. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड योजनेअंतर्गत ६.३० कोटी निधी मंजूर झाला आहे .

यावेळी उरण नगरसेवक रवी भोईर, प्रसाद भोईर, प्रसाद भोईर करंजा मच्छिमार सोसायटी चेअरमन प्रदीप नाखवा, चाणजे ग्रामपंचायत सदस्य रविंद्र कोळी, चाणजे ग्रामपंचायत सदस्य कैलास भोईर , करंजा मच्छिमार सोसायटी सदस्य, राजेश नाखवा यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# स्टार पॉईंटचा सर्वसामान्यांना आधार

## आठ वर्षात १५ हजारहून अधिक ग्राहकांना सेवा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**




बँकेत रांगे उभे राहून खाते उघडणे, पैसे काढणे, पैसे भरणे अशा अनेक कामांसाठी बँकेत रांगेत उभे राहवे लागते. ग्राहकांची ही समस्या दुर करण्यासाठी बँक ऑफ इंडियाच्या पुढाकाराने अलिबागमध्ये ग्राहकांच्या सेवेसाठी स्टार पॉईंट नावाची संस्था सुरू करण्यात आली. या स्टार पॉईंटच्या आधारे आतापर्यंत १५ हजारहून अधिक ग्राहकांना आधार मिळाला आहे. तात्काळ सेवा मिळत असल्याने स्टार पॉईंटला अधिक पसंती दर्शविली जात असल्याचे चित्र आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या बँका आहेत. या बँकामध्ये बचत खात्यापासून करंट खाते उघडले जात आहे. बँकामध्ये पैसे भरण्यापासून पैसे काढण्यापर्यंतची अनेक कामे केली जातात.

शासनाच्या वेगवेगळ्या योजनादेखील राबविल्या जातात. ग्राहकांना बँकेत रांगेत उभे राहून आपली कामे करावी लागतात. अनेक वेळा वेगवेगळ्या तांत्रिक कारणांमुळे कामांचा खोळंबा होतो. ग्राहकांना तात्काळ चांगली सेवा उपलब्ध व्हावी, म्हणून बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेतला आहे. बँक ऑफ इंडिया पुरस्कृत अलिबाग शहरामध्ये स्टार पॉईंट नावाची संस्था सूरू केली आहे.

या स्टार पॉईंटला मिनी एटीएमदेखील बोलले जाते. स्टार पॉईंटमधून पैसे काढणे, पैसे भरण्याची कामे केली जात असताना, प्रधानमंत्री जनधन योजना, अपघात विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, लाडकी बहिण योजना अशा वेगवेगळ्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम या स्टार पॉईंटच्या माध्यमातून करण्यात आले. बँक ऑफ इंडिया पुरस्कृत स्टार पॉईंट चालविण्याचे काम महेश पाटील करीत आहेत. बँक ऑफ इंडियाची लिंक ब्रँच म्हणून या स्टार पॉईंटला बोलले जाते.

### कृषितरंग आंतरशालेय नृत्य स्पर्धा

## रानपाखरं-वरप आश्रमशाळेचे नृत्य ठरले अव्वल



**। पेण । प्रतिनिधी ।**

जेएसडब्लू फाऊंडेशन डोलवी आणि वनराई संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ व ९ जानेवारी रोजी पेण येथे आयोजित केलेल्या कृषितरंग २०२६ या कार्यक्रमात कृषिप्रदर्शन तर होतेच, पण त्याच बरोबर शालेय विद्यार्थ्यांसाठी शेती व पर्यावरण विषयावर आधारीत विज्ञान प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा आणि नृत्य स्पर्धेचे आयोजन देखील केले होते.

रायगडजिल्ह्यातीलअनेक शाळा या स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या होत्या. पण विशेष आकर्षण ठरली ती ९ जानेवारी रोजी आयोजित केलेली आंतरशालेय नृत्य स्पर्धा. या स्पर्धेत पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचालित अनुदानित माध्यमिक रानपाखरं आश्रम शाळा वरप मधील आदिवासी विद्यार्थ्यांनी जे समूहनृत्य सादर केले त्याने सगळ्या प्रेक्षकांची मने जिंकली. या नृत्याच्या मधून त्यांनी आदिवासी संस्कृतीच्या माध्यमातून जंगलतोडीचे दुष्परिणाम व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. म्हणूनच या समूहनृत्याला परीक्षकांनी प्रथम क्रमांक दिला. स्पर्धेचे परीक्षण झी मराठी ऐका पेक्षा ऐक फेम प्रसिद्ध नृत्यांगना सोनाली पवार आणि ढोलकीच्या तालावर विजेती नेहा पाटील यांनी केले.

या नृत्याचे संपूर्ण दिग्दर्शन प्रशांत म्हात्रे यांनी केले आणि नृत्याला आवश्यक नेपथ्य, कला शिक्षक सतीश जुईकर, संजय जाधव, लक्ष्मण दोरे यांनी केले.



# मोदींचा भारत गप्प का?

डोनाल्ड ट्रम्प हा चक्रम व बेभरवशाचा माणूस आहे. अमेरिकेचा अध्यक्ष आहे म्हणूनच केवळ त्याचा आदरार्थी उल्लेख करायचा. या इसमाने गेल्या काही महिन्यांपासून भारताची सातत्याने खिल्ली उडवली आहे. पण वाईट असे की नरेंद्र मोदींचा भारत हे सर्व निमूटपणे ऐकून घेत आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातला व्यापार करार बऱ्याच दिवसांपासून रखडला आहे. मोदी ट्रम्प यांना फोन करीत नसल्याने हा करार झालेला नाही असा दावा अमेरिकेचे व्यापारमंत्री हॉवर्ड लुटनिक यांनी केला आहे. यावर मोदी यांनी ट्रम्प यांच्याशी गेल्या सहा महिन्यांत किती वेळा फोनवरून संवाद साधला याची जंत्री आपल्या परराष्ट्र खात्याने दिली आहे. ते खरे असेल. दहा वेळा फोन झालेही असतील. पण व्यापार करारातील अडचणी दूर करण्याबाबत काही बोलणे मोदींनी केले का हा खरा सवाल आहे. ट्रम्प गेल्या वीस जानेवारीला सत्तेत आले. त्यानंतर त्यांनी एक एप्रिलला अनेक देशांवर दणकावून आयातकर लावले. भारतावर तर सर्वाधिक कर लावला. आधी २५ टक्के, नंतर ५० टक्के. आता तर रशियाकडून तेल खरेदी केल्यास ५०० टक्के कर लावण्याचा प्रस्ताव आहे. रशियाकडून तेल घेणाऱ्यांमध्ये चीन अग्रभागी आहे. पण त्याची आर्थिक ताकद इतकी आहे की, ट्रम्पच्या धमकावणीला तो अजिबात भीक घालत नाही. ट्रम्पही चीनबाबत वेडेवाकडे काही बोलत नाहीत. उलट चीनला आपण भेट देणार आहोत असे त्यांनी यापूर्वी स्वतःच जाहीर केले आहे. याउलट भारताचा मात्र ट्रम्प पदोपदी उपहासाने उल्लेख करताना दिसतात. मध्यंतरी मोदी यांनी सर मला आपली भेट मिळू शकेल काय असे अजिजीने विचारले असे ट्रम्प म्हणाले. साधारणपणे कोणतेही राष्ट्रप्रमुख एकदुसऱ्याला मिस्टर प्रेसिडेंट किंवा मिस्टर प्राईम मिनिस्टर असे म्हणतात. सर हे अभिवादन मालक किंवा आपला वरिष्ठ साहेब यांच्यासाठीच वापरले जाते. मोदींनी खरोखरच तसे ते वापरले असेल तर भारत अमेरिकेला आपली मालक समजतो असा समज होण्याचा संभव आहे. ट्रम्प यांना तोच समज बळकट करायचा आहे.

### म्हणे, आम्ही विश्वगुरु

पण मुद्दा असा की, एरवी १४० कोटींच्या भारताची ताकद, भारत म्हणजे विश्वगुरु अशा बाता मारणाऱ्या नरेंद्र मोदी व त्यांच्या प्रवक्त्यांचे तोंड बंद का आहे? ट्रम्प व अमेरिकेच्या प्रत्येक टीकेला व हिणवण्याला ते जशास तसे उत्तर का देऊ शकत नाहीत? ट्रम्प हे फ्रान्सचे मॅकरॉन, दक्षिण आफ्रिकेचे सिव्हिल रामफोसा अशांच्या बाबतीतही असेच गैर उद्गार काढत असतात. पण मॅकरॉन यांचा पक्ष फ्रान्समध्ये अल्पमतात आहे. त्यांची सत्ता कधीही जाईल अशी अवस्था आहे. आफ्रिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे. याउलट, भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आणि सर्वात मोठी बाजारपेठ आहे. म्हणजेच, मोदींच्या मागे मोठी ताकद आहे. अशा वेळी त्यांना इतर कोण्या राष्ट्रप्रमुखांप्रमाणे दबून राहण्याची गरज नाही. ऑपरेशन सिंदूरचे युध्द आपण थांबवले असा दावा ट्रम्प यांनी आजवर किमान ६० वेळा तरी केला आहे. पण त्याला भारताने ठणकावून प्रत्युत्तर दिलेले नाही. परवा व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो व त्यांची पत्नी यांना एका मध्यरात्री अटक करून ट्रम्पच्या सैन्याने अमेरिकेत आणले व यापुढे व्हेनेझुएलाचे सरकार आपण चालवणार असे जाहीर केले. पण याबाबत ट्रम्प व अमेरिकेचा कडक शब्दात निषेध केला जायला हवा होता. पण मोदींच्या भारताने ती हिंमत दाखवलेली नाही. मोदी मारे स्वतःला विश्वगुरु वगैरे म्हणत असले तरी इतका दुबळा आणि इतका घाबरट भारत यापूर्वी बहुदा कधीही नव्हता. ऐन बांगलादेशच्या युध्दात अमेरिकेने आपले नौदल भारतावर हल्ला करण्यासाठी इकडे पाठवून आपल्याला धमकावण्याचा प्रयत्न केला. पण इंदिरा गांधी यांनी निक्सन यांना कडक प्रत्युत्तर दिले व पाकिस्तानची फाळणी घडवून आणली. भारत तेव्हा गरीब देश होता. तरीही इंदिराजींनी स्वाभिमान सोडला नाही. आता तर भारत कितीतरी अधिक पैसेवाला आहे. इथली बाजारपेठ अमेरिका व युरोपला हवी आहे. शिवाय, चीनशी लढण्यासाठीही भारत या सर्वांसाठी महत्वाचा आहे. तरीही ट्रम्प सतत एकतर्फीपणे धमक्या देत आहेत आणि मोदींचा भारत खाली मान घालून त्या ऐकून घेत आहे हे लाजिरवाणे दृश्य आहे.

### ३० लाख रोजगार जातील

आज अमेरिकेने आपल्यावर ५० टक्के आयातशुल्क लादल्यामुळे आपल्याकडचे कापड, कपडे, जडजवाहिर, हिरे, फळे इत्यादी अमेरिकेला प्रचंड महाग पडू लागले आहे. सबब त्यांची येथून होणारी निर्यात कमी झाली आहे. येत्या काळात हे असेच चित्र राहिले तर भारतातले सुमारे ३० लाख रोजगार नष्ट होतील असा अंदाज आहे. सुरतच्या कपडा मिल तसेच हिरे बाजार बसला आहे. तेथे खूप लोक आधीच बेकार झाले आहेत. याला पर्याय म्हणून भारताने ब्रिटनशी मुक्त व्यापार करार केला आहे. जर्मनीचे राष्ट्रप्रमुख आजच देशात आले आहेत व त्यांच्याशी तसेच येत्या काळात युरोपातील इतर देशांशी असेच करार होण्याची शक्यता आहे. पण आज चीन सोडला तर जगातल्या सर्वच देशांच्या अर्थव्यवस्था मोडकळीला आलेल्या आहेत. ब्रिटनमध्ये कधी नव्हे इतकी महागाई व बेकारी आहे. युरोपमध्ये परकीय माणसे व परकीय माल यांच्याविरुध्द मोहिमा राबवल्या जात आहेत. शिवाय चीनच्या पातळीवर जाऊन त्याच्याइतका स्वस्त माल करणे भारतच काय कोणाच देशाला जमलेले नाही. या स्थितीचा सामना करणे सोपे नाही. मात्र म्हणून देशाचा स्वाभिमान गहाण टाकून ट्रम्पसमोर लाचार होण्याची गरज नाही. किंबहुना, हीच वेळ आहे की, मोदींना आपला खरा ताठ बाणा दाखवण्याची. यासाठी मोदींच्या सरकारने सर्व देशाला विचारात घ्यायला हवे. आपण विश्वगुरु आहोत किंवा आपली अर्थव्यवस्था किती जोरात चालली आहे याच्या आकडेवाऱ्या प्रसृत करून स्वतःवर खूष राहणे बंद करायला हवे. पण हे त्यांना जमणे कठीण आहे. विरोधकांना तुच्छ लेखायचे, त्यांना संपवून टाकण्याची सतत भाषा करायची, लोकांना मूर्ख समजायचे हेच मोदींचे राजकारण राहिले आहे. त्यामुळे ते जगात व देशात एकाकी पडत चालले आहेत. ट्रम्पने राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेताना मोदींना बोलावले नव्हते. नंतर मोदी गेल्या फेब्रुवारीत भेटायला गेले तेव्हाही त्यांना नीट वागणूक मिळाली नाही. पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानचा हात आहे असे आपण म्हणत होतो तेव्हाच ट्रम्प पाकिस्तानच्या असीफ मुनीर यांच्या गळ्यात गळे घालत होते. त्यांना शाही मेजवान्या देत होते. याच दरम्यान आपल्यावर सर्वाधिक आयातशुल्क लादण्यात आले. मग आपण अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याबाबत वाटाघाटी करू लागलो. हा करार अंतिम टप्प्यात आहे असे पियूष गोयल गेले कित्येक महिने सांगत आहेत. आता अमेरिकेनेच भारताची बस चुकली आहे असे जाहीर केले आहे. या स्थितीत तरी आपण मान वर करून प्रत्युत्तर देणार की नाही हा खरा प्रश्न आहे.

विचार

# आयात शुल्क फसले; ट्रंप यांची जिरली

***गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये भारतातील थेट परकीय गुंतवणूक वाढली असून जगभर भारतीय इंजिनिअरिंग प्रॉडक्टस आणि वाहनांच्या सुट्या भागांची मागणी वाढली आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांचे भारताला शिक्षा करण्याचे मनसुबे हवेतच विरले आहेत. आता बदललेला भारत कोणाच्याही दबावापुढे झुकत नाही. अतिरिक्त आयात शुल्क लादून ट्रम्प भारताला नामोहरम करु शकत नाही, हे सिध्द झाले आहे.***

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

सरलेल्या ऑगस्टमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरुद्ध ५० टक्के आयात शुल्काची घोषणा केली. त्यातील २५ टक्के टॅरिफ भारताबरोबरील करारात सवलती मिळत नसल्याच्या कारणास्तव तर २५ टक्के आपण रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे शिक्षेस्वरुपात आकारण्यात आला. एकंदरच डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या सल्लागार समितीच्या मते, इतके प्रचंड आयात शुल्क आकारल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होणे अपेक्षित होते. भारतातील रोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढून अर्थव्यवस्थेला धक्का बसेल, असाही त्यांचा समज होता. त्यातील एका सल्लागाराने तर भारताची अर्थव्यवस्था मृत असल्याचे वक्तव्यही केले. मात्र आज आपण या दिवसापासून बरेच पुढे निघून आलो आहोत. गेल्या तीन-चार महिन्यातील घडामोडी बघता दिसते की, डोनाल्ड ट्रम्प भारतविरोधी धोरणांमुळे चांगलेच तोंडघशी पडले असून भारताने अमेरिकेला तिची जागा दाखवली आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, अमेरिकेने इतके मोठे पाऊल उचलणे आपल्यासाठी इष्टापत्तीच ठरले आहे. कसे ते पाहू या.

सुरूवातीला अर्थातच याचा काहीसा नकारात्मक परिणाम जाणवला. पण त्यानंतर काही गोष्टी अतिशय चांगल्या घडल्या. वर्षारंभी त्याचीच चर्चा करायला हवी. यातील पहिली बाब म्हणजे टॅरिफ युद्धामुळे आपले अमेरिकेवरील वाढते अवलंबित्व कमी झाले. हे अवलंबित्व वस्तू, सेवा वा भारतीय विद्यार्थ्यांची मानसिकता वा एकूणच सामान्य नागरिकांना अमेरिकेप्रती असणारे अप्रूप अशा सगळ्याच अर्थाने होते. पण या एका घटनेने भारताला आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडले. १९९१ नंतर भारतात मुक्त अर्थव्यवस्थेची सुरूवात झाली होती. परिणामस्वरुप, अनेक क्षेत्रांमध्ये वेगाने बदल दिसला होता. मात्र व्यापार धोरणक्षेत्रामध्ये हव्या त्या प्रमाणात बदल घडवले गेले नव्हते. दुसरीकडे, भारताला अन्य देशांमध्ये माल विकायचा आहे तसेच अन्य देशांनाही भारतात माल विकायचा आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे भारतातील बाजारक्षेत्र प्रचंड आहे. त्यातच आपल्याकडे ६५ ते ७० कोटी मध्यमवर्ग असल्यामुळे जगाला इथल्या अवाढव्य बाजारात आपला माल विकण्याची इच्छा आणि गरज आहे. मात्र बाजार घटकांमध्ये अपेक्षित बदल झाले नसल्यामुळे भारताचे इतरांवरील परावलंबित्व वाढत होते. त्यामुळेच अमेरिकेच्या जाचक अटींनंतर भारताने आत्मनिरीक्षण करण्यास सुरूवात केली आणि बाजार सुधारणांमध्ये, आयात शुल्क धोरणांमध्ये हळूहळू बदल घडवून आणले गेले. त्याचे परिणाम लवकरच दिसून येणार आहेत.

दुसरे म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला पूर्वीचे उच्च स्थान पुन्हा मिळवून देण्याचा चंग बांधला असून आपला देश जगाच्या केंद्रस्थानी असेल, असे म्हणत आपण म्हणू तसे जग नाचेल, आपण हवे तसे जगाला झुकवू शकतो असा त्यांचा विचार होता. आम्ही विश्व व्यापार संघटन, युनायटेड नेशनला मानत नाही अशीच त्यांची भूमिका राहिली. मात्र आता अनेक देशांनी अमेरिकेला त्यांची जागा, लायकी दाखवली आहे. वाढीव आयात शुल्काचे धोरण राबवून आपण भारताचे काहीही वाकडे करु शकत नसल्याचे त्यांना एव्हाना उमगले आहे. त्यामुळेच आता ट्रम्प यांचीच खरी अडचण झाली आहे. भारताविरोधातील हे धोरण मागे घेतले तरी त्यांच्यापुढे अडचणी आहेत आणि ते सुरू ठेवले तरी त्यांच्याच अडचणी वाढणार आहेत.

आयात शुल्काचे हे हत्यार उपसताना भारतातील कृषी, दुग्धोत्पादन आणि मत्स्य या तीन क्षेत्रांना भारताने १०० टक्के मुक्तव्यापाराच्या परिघात आणावे आणि आयात शुल्क शून्य टक्क्यावर आणावे; जेणेकरुन अमेरिकेतील सोयाबिन, कापूस, मका आदी जनुकांमध्ये बदल केलेली कृषी उत्पादने भारताच्या बाजारपेठेत विकता येतील आणि तेथील सफरचंद, बदाम यांच्यावर शून्य टक्के आयात कर लागेल, असा डोनाल्ड ट्रम्प यांचा विचार होता. किंबहुना त्यांनी हा प्रतिष्ठेचा विषयच केला होता. भारतावरच नव्हे, तर जपान, इंडोनेशिया, युरोपमधील अनेक देशांवरही त्यांनी असाच दबाब टाकला. या सगळ्यात जपान त्यांच्यापुढे झुकला आणि अमेरिकेशी व्यापार करार केले. आपले कृषीक्षेत्र अमेरिकन कृषीमालासाठी पूर्णपणे उघडले. इंडोनेशियानेदेखील त्यांचाच कित्ता गिरवत आपल्याकडील कृषी बाजारपेठ अमेरिकेसाठी उघडली. युरोपियन महासंघानेही अमेरिकेशी व्यापार करार केलेला आपण पाहिला. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दबावाला पुरुन उरला तो केवळ भारत. कोणताही दबाव आला तरी आम्ही कृषी, डेअरी आणि मत्स्य ही क्षेत्रे शून्य आयात शुल्काच्या धोरणांतर्गत आणणार नसल्याची आपली भूमिका कायम राहिली.

अमेरिकेकडून दबाव वाढताच भारताने तातडीने आपल्या व्यापार धोरणांमध्ये बदल करण्यास सुरूवात केली. खरे पाहता अमेरिकेच्या या बदलत्या धोरणांमुळे आपला त्यांच्याशी असणारा ३२ अब्ज डॉलरचा व्यापार धोक्यात आला होता. हे संकट मोठे होते. पण त्याची धग कमी करण्यासाठी मागील चार महिन्यांमध्ये भारताने इंग्लडबरोबर एक मुक्त व्यापार करार केला. त्यानंतर ओमानबरोबरही मुक्त व्यापार केला आणि त्यानंतर नुकतेच भारताने गेले नऊ महिने न्युझिलंडशी सुरू असलेली मुक्त व्यापारचर्चाही पूर्णत्वास नेली. त्यामुळे लवकरच आपण न्युझिलंडशीही मुक्त व्यापार करणार आहोत. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे वर उल्लेख केलेले हे तीनही देश भारताच्या निर्यातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क धोरणामुळे प्रामुख्याने इंजिनिअरिंग आणि वाहनांचे सुटे भाग प्रभावित झाले. इथे लक्षात घ्यायला हवे की, न्युझिलंड, इथिओपिया, ओमान या देशांना होणाऱ्या निर्यातीमध्ये प्रामुख्याने वाहनांचे सुटे भाग आणि इंजिनिअरिंगचा समावेश आहे. त्यानंतर प्रभावित होणारे तयार कपडे आणि कातडी वस्तूंचे क्षेत्र आपण ओमान, इथिओपिया आणि इंग्लडच्या बाजारपेठेमध्ये वळवू शकणार आहोत. मौल्यवान हिरे आणि दागिन्यांसाठी मध्यपूर्वेचा भाग, आफ्रिका आणि युरोपमधील बाजारपेठा आपल्यासाठी उघडल्या गेल्या आहेत. चौथ्या आणि महत्त्वाच्या कृषी आणि मत्स्य व्यवसायासाठीही आपल्याला नवीन बाजारपेठा मिळाल्या आहेत.

काही दिवसांपूर्वीच रशियाचे अध्यक्ष भारतभेटीवर आले होते. या माध्यमातूनही ऐतिहासिक घडामोडी घडल्या आणि रशियाची बाजारपेठ भारतीय वस्तूंसाठी खुली झाली. त्याचप्रमाणे दोन्ही देशांमधील व्यापार २०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे दोन्ही नेत्यांनी ठरवले. खेरीज या चर्चेअंतर्गत पुढील दहा वर्षांमध्ये तीस लाख भारतीयांना रशियात रोजगार प्राप्त होणार आहे. अशाच प्रकारे न्युझिलंडशीही करार झाला असून त्यायोगे भारतीय मालाला तेथे ९९ टक्के आयात शुल्क विरहित प्रवेश मिळणार आहे. ओमान आणि युएईमध्येही हेच लाभ मिळणार आहेत. या सगळ्या घडामोडींमुळे गेल्या तीन महिन्यांमध्ये आपली निर्यात कमालीची वाढली आहे. आकड्यांमध्ये सांगायचे तर ऑक्टोबरमध्ये भारताची व्यापार तूट साधारणत: ४१ अब्ज डॉलर इतकी होती. नोव्हेंबरमध्ये म्हणजे एकाच महिन्यात त्यात जवळपास १६ अब्जची घट झाली आणि तूट २५ अब्ज डॉलरवर आली. भारताने सोने, तेल आणि कोळसा यांची आयात कमी करणे हे यामागचे कारण आहे. त्यामुळे तूट कमालीची घटलेली दिसली. याच नोव्हेंबरमध्ये भारताची एकूण निर्यात ३८ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अन्यायकारक टॅरिफ लावल्यानंतर लगेचच्या महिन्यात दिसलेली ही स्थिती आहे. दुसरीकडे, भारताचा वस्तू आणि सेवांशी संबंधित अमेरिकेशी असणारा व्यापार गेल्या तीन महिन्यांमध्ये चांगलाच वाढला आहे. भारताकडून अमेरिकेत जाणाऱ्या जलवाहतुकीमध्ये २२ टक्क्यांची वाढ झाली आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा केवळ कागदोपत्री राहिली आहे, असे आपण म्हणू शकतो.

गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये भारतातील थेट परकीय गुंतवणूकही वाढली आहे. दुसरीकडे, जगभर भारतीय वस्तूंना वाढलेल्या मागणीमध्ये इंजिनिअरिंग प्रॉडक्टस आणि वाहनांचे सुटे भाग यांचा समावेश आहे. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारताला शिक्षा करण्याच्या मनसुबे हवेतच विरले आहेत. आता जग बदललेला भारत पहात आहे. तो कोणाच्याही आणि कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही, बळी पडणार नाही हे आता सगळ्यांनी पाहिले आहे. अमेरिकेला अशा प्रकारचा दबाव टाकण्याची सवयच आहे. अटबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना १९९८ मध्ये अणुचाचणी केली तेव्हा याच अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादले होते. मात्र २००१ मध्ये ते त्यांना स्वत:हून मागे घ्यावे लागले, कारण या खंडप्राय देशात १४० कोटींची लोकसंख्या असणाऱ्या भारतात, ६५ ते ७० कोटी मध्यमवर्ग असणाऱ्या या भागात सगळ्यांनाच व्यापार वाढवायचा आहे. असे असल्यामुळे आर्थिक निर्बंध कुचकामी ठरतील हे त्यांनी जाणले आणि पाऊल मागे घेतले. आता डोनाल्ड ट्रम्प यांना नव्याने याची प्रचिती येत आहे. येत्या काळात भारताची निर्यात वाढणारच आहे.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

# इमेजमुळे नव्या पर्यटन स्थळांची ओळख

**प्रमोद जाधव**

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने कायमच महत्वाचा ठरत आहे. या पर्यटनाला अधिक उभारी देण्यासाठी अलिबागमधील तीन छायाचित्रकारांनी एकत्र येत इमेज कॅलेंडरची निर्मिती केली. या कॅलेंडरमध्ये निवडक निसर्ग, गडकिल्ले यांची छायाचित्र प्रसिध्द करून सर्वसामान्य छायाचित्रकारांना हक्काचे व्यासपिठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. यातून हजारो छायाचित्र कारांसह छायाचित्र काढण्याचे छंद असणाऱ्यांना एक वेगळा इमेज प्राप्त करून दिली आहे. या इमेजमुळे नव्या पर्यटन स्थळांची ओळख निर्माण झाली आहे.

अलिबागमधील अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सभागृहात शनिवारी(दि.३) इमेज कॅलेडरच्या प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष,तथा गटनेते,विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक, सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन योगेश मगर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ईमेज कॅलेंडरचे प्रमूख रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण, समीर मालोदे, आदींसह पत्रकार, छायाचित्रकार, सत्कार मुर्ती उपस्थित होते.

कोणत्याही उपक्रमाची सुरुवात करणे सोपे आहे, मात्र त्याचे सातत्य राखणे कठीण आहे. इमेज कॅलेडरने आठ वर्षात पदार्पण केले आहे. या कॅलेडरची निर्मिती, मेहनत फार महत्वाची आहे. रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण आणि समिर मालोदे या तिघांनी कॅलेंडरच्या माध्यमातून जिल्हयातील पर्यटन स्थळांसह संस्कृतीची माहिती, ओळख छायाचित्राद्वारे पोहचविण्याचे काम केले आहे. पर्यटन स्थळांसह सण उत्सवाची माहिती चित्रांद्वारे कॅलेंडरच्या रुपात



पहावयास मिळत आहे.

रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण व समीर मालोदे हे तिघेही प्रेस छायाचित्रकार आहेत. छायाचित्रकार म्हणून त्यांनी अगदी कमी कालावधीत वेगळी ओळख निर्माण केली आहे. वेगवेगळ्या वृत्तपत्रात ते छायाचित्रकार म्हणून काम करतात. रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, मांडवा, काशीद, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन मधील समुद्रकिनारे, कुलाबा किल्ला, जंजिरा व पद्मदुर्ग, खांदेरी व उंदेरी किल्ल्यांबरोबरच जिल्ह्यात वेगवेगळी ऐतिहासिक गड किल्ले, मंदिर, धबधबे, निसर्गाने नटलेली नारळी पोफळीच्या बागा, डोंगर पर्यटकांच्या कायमच पसंतीला उतरलेली असतात. येथील क्षणचित्र आपल्या मोबाईलमध्ये टीपण्याचे काम अनेकजण करतात. जिल्ह्यातील पर्यटनाची ओळख अधिक निर्माण व्हावी, नव्या पर्यटन स्थळांची माहिती पर्यटकांना मिळावी, यासाठी अलिबागमधील रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण आणि समीर मालोदे या तीन छायाचित्रकारांनी एकत्र येऊन इमेज कॅलेंडरची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. आठ वर्षापुर्वी ही संकल्पना सुरू केली. रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांसह येथील सण उत्सवाची ओळख कॅलेंडरच्या माध्यमातून घराघरात पोहचावी यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. छायाचित्रकारांसह ज्यांना चित्र काढण्याचे छंद आहे, अशा सर्वसामान्यांना देखील यामध्ये स्थान देण्याचे काम केले आहे. दरवर्षी निसर्ग व गडकिल्ल्यांचे छायाचित्र मागविले जातात. त्यानंतर त्यातील १२ छायाचित्रांची निवड करून इमेज कॅलेंडरमध्ये प्रसिध्द केले जातात. वेगवेगळ्या छायाचित्रांची ओळख दाखविण्याचे काम केले जात आहे.

यावर्षीदेखील इमेज कॅलेंडरसाठी गडकिल्ले, पर्यटनस्थळे आदी छायाचित्रांची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ४७८ जणांनी सहभाग घेतले होते. ज्येष्ठ छायाचित्रकार जयंत धुळप यांनी परीक्षण केले. या छायाचित्रांमधून महाडमधील दीक्षित कांबळे, श्रीबागमधील वैभव शिंदे, अलिबागमधील महेंद्र महाडिक, थळमधील शुभम सुंकले, अलिबागमधील डॉ. गणेश गवळी, गोंधळपाडाधील निलेश दुदम, मुरूडमधील भारत रांजणकर, मिळकतखारमधील सनीश म्हात्रे, पेणमधील जयंत ठाकूर, महाडमधील कल्पेश पाटील, उसर येथील मोनिका औचटकर, अलिबागमधील सुनील ठोकळ यांनी काढलेल्या छायाचित्रांची निवड करण्यात आली. हे छायाचित्र इमेज कॅलेंडरमध्ये प्रसिध्द करण्यात आले. या बारा छायाचित्रकारांचा विशेष सन्मान प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला.

लोकसंसद

## नेतृत्व कोणाकडे आहे हे फार महत्त्वाचे- अजित डोभाल

दिल्लीत ‘विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग’ या कार्यक्रमातत अजित डोभाल युवकांना संबोधित करत होते. ‘‘तुम्हाला नेतृत्व कर्तुत्व सिद्ध करण्यासाठी व्यापार संरक्षण, शिक्षण, औषध निर्माण, परराष्ट्र धोरण, तंत्रज्ञान, दळणवळण अशी नानाविध क्षेत्रे उपलब्ध आहेत. तुम्ही फार भाग्यवान आहात स्वतंत्र भारतात जन्मला आहात. पण आज जो भारत तुम्हाला दिसतो आहे या मुक्कामापर्यंत येण्यासाठी भारतीयांना अनेक हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या, अपमान सोसावा लागला संघर्ष करावा लागला. भारतीय संस्कृती सहिष्णुवृत्तीची आहे, भारतीयांनी कुणावरही अन्याय, अत्याचार केलेले नाही.तरीही आपल्या मातृशक्तीला नासवण्यात आले, त्यांची अब्रू लुटली गेली. हा इतिहास विसरता कामा नये. आपल्याला शत्रू बोध होणे आवश्यक आहे. तुम्ही तरुण आहात, तुम्ही भविष्याचे स्वप्न बघत असाल! स्वप्न बघण्यात गैर काहीच नाही परंतु स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अविश्रान्त मेहनत, प्रबळ इच्छाशक्ती आणि धैर्य यांची आवश्यकता असते. स्वीकारलेल्या पथावर न थकता चालत राहण्याचा मनाशी ठाम निश्चय करा. काम करताना अनेक निर्णायक प्रसंग समोर येतात त्यावेळी योग्य निर्णय घेणे खूप महत्त्वाचे असते. काही वेळेला निर्णय चुकू शकतो हे लक्षात ठेवून परिस्थितीवर मात करण्यासाठी संघर्ष करावा लागतो त्यावेळी खचून न जाता धैर्याने पुढे जावे लागते’’असे कथन केले त्यांनी २०१३ मध्ये घडलेला प्रसंग सांगितला एका महिला खेळाडूला एका भीषण प्रसंगात आपले दोन्ही पाय गमवावे लागले तरीही दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर तिने गिर्यारोहणात प्रथम क्रमांक मिळवला. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर आपण कुठल्याही संकटावर मात करु शकतो हे कायम लक्षात ठेवायला हवे. प्रसिद्धीसाठी काम न करता योग्य होण्यासाठी, देशासाठी काम केले तर आपोआप प्रसिद्धी होते असे म्हणले त्यांनी पुढे सांगितले की, सिंहाच्या कळपाचे नेतृत्व शेळीकडे असेल तर लढाई जिंकली जात नाही. पण नेतृत्व सिंहाचे असेल तर शेळ्यांचा कळप सुद्धा लढाई जिंकतो. नेतृत्वाची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आत्मबळ तसेच निस्वार्थ बुद्धी आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर भारताने आपली प्रतिमा उंचावली आहे. कोणतेही क्षेत्र असू दे राष्ट्रहित सर्वप्रथम हाच विचार दृढ असला पाहिजे.

**– श्रीमती संध्या काटदरे,** माणगाव

विशेष

# ‘न खाई भोगी तो सदा रोगी’ हे



मकरसंक्रातीच्या आदल्या दिवशी येणारा दिवस म्हणजे ‘भोगी’ ‘न खाई भोगी तो सदा रोगी’ हे आपण आपल्या आजीकडून नेहमी ऐकले आहे. मात्र, या भोगी शब्दाचा शब्दश: अर्थ काय हे बऱ्याच जणांना माहिती नाही. चला तर जाणून घेऊया ‘भोगी’चा अर्थ आणि त्याचे महत्व देखील.

‘भोगी’ हा इंग्रजी नवीन वर्षाचा पहिला सण असून हा सण मकरसंक्राती या सणाच्या आदल्या दिवशी येतो. भोगी या शब्दाचा अर्थ आहे आनंद घेणारा वा उपभोगणारा. या सणाच्या दिवशी घर तसेच घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करुन घराच्या अंगणाभोवती रांगोळी काढण्यात येते. तसेच घरातील सर्व जण अभ्यंग स्नान करून नवीन कपडे परिधान करतात. तर या दिवशी आंघोळीच्या पाण्यात तीळ टाकण्याची देखील पद्धत आहे. यामुळे येणारा उन्हाळा ऋतू बाधत नाही, असे बोलले जाते. त्याचप्रमाणे या दिवशी मुली भोगी सणाचा आनंद घेण्यासाठी माहेरी येतात. जानेवारी महिन्यात येणारा पहिला सण हा भोगी असतो. त्यामुळे या महिन्यात हिवाळा देखील असतो. विशेष म्हणजे या मोसमात सर्व प्रकारच्या भाज्या येतात. तसेच शेताला नवीन बहार आलेला असतो. त्यामुळे थकलेल्या शेतकऱ्यास विसावा लागतो. दरम्यान, या भोगी सणानिमित्त शेतकरी भोगीची भाजी (यात प्रामुख्याने हरभरा, पावटा, घेवडा, वांगे, गाजर, कांद्याची पात, शेंगदाणा, वाटाणा, चाकवत, फ्लॉवर आदी भाज्या वापरल्या जातात.) आणि त्यासोबत तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी, पापड, वांग्याचे भरीत, चटणी आणि खमंग खिचडी करण्याची परंपरा आहे. विशेष म्हणजे भोगीची भाजी अतिशय चवदार लागते. यात फोडणीला तीळ असतातच. भोगीला ही भाजी सर्वत्र केली जाते. मात्र, ती करण्याच्या पद्धतीत थोडाबहुत फरक असतो. बाजरी आणि तिळामध्ये उष्णता असल्याने या दिवशी या तीळ लावलेली बाजरीची भाकरी आणि भोगीची भाजी खाण्याची पद्धत आहे. तसेच भोगीची भाजीही तिळाचा कूट घालून केली जाते. या पदार्थांमधून उष्णता घेऊन शेतकरी पुन्हा वर्षभर कामाला लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा सण महत्त्वाचा असून हा सण बऱ्याच व्यक्ती साजरा देखील करतात. संपूर्ण भारतभर हा सण साजरा केला जातो. फक्त या सणाला इतर ठिकाणी वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. तामिळनाडूत हा सण ‘पोंगल’ म्हणून सजरा करतात. तर आसाममध्ये ‘भोगली बहू’ म्हणून साजरा करतात. तर पंजाबमध्ये ‘लोहिरी’, राजस्थानमध्ये ‘उत्तरावन’ म्हणून साजरा केला जातो. या दिवशी जुन्या वाईटचा त्याग करुन चांगल्या गोष्टी अंगिकारल्या जातात.

भोगीच्या दिवशी इंद्र देवाची आठवण काढली जाते. इंद्र देवाने आपल्या धर्तीवर उदंड पिकं पिकावी म्हणून प्रार्थना केली होती, अशी मान्यता आहे. ती पिकं वर्षानुवर्ष पुढेही पिकत राहावी अशी प्रार्थना भोगीच्या दिवशी केली जाते. या दिवशी काही राज्यांमध्ये लहानशी होळी पेटवून त्यात काही वस्तूंची आहुतीही दिली जाते. पूर्वी मालक वर्ग आपल्या या दिवशी कर्मचाऱ्यांना काही वस्तू भेट म्हणूनही देत असतात. शेताला नवीन बहार आलेला असतो. त्यामुळे थकलेल्या शेतकऱ्यास थोडासा विसावा लाभतो. मग या काळात शेतकरी भोगीची भाजी आणि तीळ लावलेल्या बाजरीच्या भाकरीचा आस्वाद घेतात. या पदार्थांमधून उष्णता घेऊन शेतकरी पुन्हा वर्षभर शेतात काम करण्यास सज्ज होतात.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१३ जानेवारी**

१) श्री. भास्कर विष्णू अन्जर्लेकर गोंधळपाडा, अलिबाग, १३-१-१९३८
२) श्रीम.शुभांगी एकनाथ पाटील चेंढरे, अलिबाग १३-१-१९५०
३)श्री.आनंत रामजी घाडगे मु.कुरूळ, अलिबाग १३-१-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. अंजना दत्तात्रय चौलकर, स्मरणार्थ अलिबाग**

**कै. पार्वती गोपाळ वाटकरे, स्मरणार्थ, नवगाव, अलिबाग**

# निधीअभावी नाट्यगृह अपूर्ण

## ● नाट्यरसिकांच्या अपेक्षांवर विरजण; आठ वर्षांची प्रतीक्षा अद्याप कायम



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा देणारे, बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित नाट्यगृह आजही निधीअभावी अपूर्ण अवस्थेत उभे आहे. गेली तब्बल आठ वर्षे हे बांधकाम रखडले आहे. त्यामुळे माणगावसह परिसरातील नाट्यरसिक, कलाकार आणि सांस्कृतिक चळवळीशी जोडलेले घटक प्रचंड निराशा आणि संताप व्यक्त करत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून आवश्यक निधी मिळत नसल्याने हे स्वप्न अद्याप अपूर्णच आहे.

सोमवार दि.८ जानेवारी २०१८ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात या नाट्यगृहाचे भूमिपूजन व बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला होता. सुरुवातीला काही प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने काम वेगाने सुरू झाले. मात्र मंजूर निधीपेक्षा अधिक काम झाल्याने पुढील टप्प्यासाठी निधीची गरज भासू लागली. निधी लवकरच मिळेल, या आशेवर ठेकेदारांनी काम सुरू ठेवले; परंतु, कालांतराने ही आशा फोल ठरली.

हे अत्याधुनिक नाट्यगृह जुने माणगाव येथील शासकीय विश्रामगृहासमोरील शासनाच्या सुमारे दोन एकर जागेवर उभारण्यात येत आहे. सुमारे ७०० प्रेक्षकांची आसन क्षमता, आधुनिक प्रकाश व ध्वनी व्यवस्था, कलाकारांसाठी आवश्यक सुविधा तसेच मोठ्या वाहनतळाची व्यवस्था या नाट्यगृहात प्रस्तावित आहे. माणगाव शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व नाट्य कार्यक्रमांसाठी स्वतंत्र नाट्यगृह असावे, हे स्वप्न स्वर्गीय माजी आमदार अशोकदादा साबळे यांनी पाहिले होते. त्यांच्या या स्वप्नाला साकार करण्यासाठी त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यातूनच या नाट्यगृहास मान्यता व मंजुरी मिळाली. मात्र आवश्यक निधी वेळेत उपलब्ध न झाल्याने शासनाची अनास्था उघडकीस येत असून, आज हे स्वप्न अपूर्ण अवस्थेतच अडकून पडले आहे.

माणगावची सांस्कृतिक शहर म्हणून ओळख निर्माण करण्याची संधी हातातून निसटू नये, हीच अपेक्षा आज प्रत्येक नाट्यरसिक व्यक्त करत आहे.

### पूर्णत्वासाठी वाढीव निधीची गरज

आठ वर्षांच्या कालावधीत बांधकाम साहित्याचे दर प्रचंड वाढले आहेत. त्यामुळे आज या नाट्यगृहाच्या पूर्णत्वासाठी वाढीव निधी अत्यावश्यक झाला आहे. निधी न मिळाल्याने सध्या हे काम पूर्णतः थांबविण्यात आले आहे. अपूर्ण बांधकाम माणगावच्या सांस्कृतिक उदासीनतेचे प्रतीक बनत चालले आहे.



## विद्यार्थ्यांच्या कलेला नागरिकांचा प्रतिसाद

**रसायनी :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळे येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे उत्तम सादरीकरण केले.

यावेळी माजी सभापती गजानन माळी, सरपंच प्रफुल्ल माळी काशीनाथ कांबळे, शिक्षक लक्ष्मण माळी ,शिक्षक पद्माकर झिंगे शिवाजी माळी सुनील माळी, विष्णु पवार, जांभुळकर, मुख्याध्यापिका अर्चना डोंगरे, शिक्षक भिकाजी कदम, शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष उपाध्यक्ष उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन जयवंत म्हात्रे, निवास म्हात्रे, विष्णु दळवी तसेच गावातील महिला, पुरुष, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोजगार मार्गदर्शन मेळावा उत्साहात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य व बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात सेंट्रल ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सेल, ऑन जॉब ट्रेनिंग व विद्यार्थी कौशल्य विकास विभागा अंतर्गत रोजगार मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

इन्स्टिट्यूट फॉर एक्सलन्स ॲण्ड प्लॅनिंग संस्था, ऐरावत ग्रुप, खालापूर (आय.ई.एस.पी.) यांच्या सहकार्याने आयोजित या मेळाव्यात एअरपोर्ट व विमानसेवा क्षेत्रातील विविध रोजगार संधींबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत केबिन क्रू व हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, एअरलाइन हॅंडलिंग मॅनेजमेंट, एक्स-रेड कॅप, हेल्थकेअर मॅनेजमेंट, एअरपोर्ट ऑपरेशन मॅनेजमेंट, रॅम्प इक्विपमेंट ऑपरेटर आदी क्षेत्रांतील करिअरच्या संधींची माहिती देण्यात आली. तसेच प्रशिक्षणाचा कालावधी, प्रवेश प्रक्रिया, उपलब्ध संधी, प्रारंभिक वेतन, तसेच भविष्यातील पदोन्नती याबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले.

इन्स्टिट्यूट फॉर एक्सलन्स ॲण्ड प्लॅनिंग संस्था, ऐरावत ग्रुप, खालापूर याठिकाणी प्रशिक्षण पूर्ण करत असलेले विद्यार्थी श्रद्धा पवार, तनिष्का भालेराव, स्वराज वायकर, मुस्कान यांनी संस्थेकडून मिळणारे प्रशिक्षण आणि सोयीसुविधा याबाबतीत अनुभव कथन केले.



## सविता पाटील यांचे निधन

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण कोटनाका येथील सविता माणिक पाटील (६७) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. काँग्रेसचे माजी नगरसेवक माणिक अनंता पाटील यांच्या त्या पत्नी होत. तर प्रशांत, हेमंत, देवेंद्र माणिक पाटील यांच्या त्या आई. सविता पाटील या मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. पाटील कुटुंबात त्यांनी अतिशय तळमळीने सर्वांना सांभाळले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१६) होणार आहेत, अशी माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

# किशोरवयीन मुलींना आरोग्याविषयी मार्गदर्शन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**



आयएसओ नवघर शाळेत राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून 'लेक शिकवा अभियान' अंतर्गत मुलींसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थिनींना गुड टच-बॅड टच आणि किशोरवयीन आरोग्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती लहरिया आणि आरोग्य सेविका सुवर्णा दुर्गे यांनी यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. डॉ. ज्योती लहरिया यांनी मुलींना गुड टच आणि बॅड टचमधील फरक समजावून सांगितला. स्वतःच्या शरीराचे रक्षण कसे करावे आणि अनुचित प्रकार घडल्यास न घाबरता कोणाकडे मदत मागावी, याचे अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. आरोग्य सेविका सुवर्णा दुर्गे यांनी किशोरवयीन मुलींना या वयात शरीरात होणारे बदल, मासिक पाळी दरम्यान घ्यायची काळजी आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

'लेक शिकवा अभियान' या शासनाच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. मुलींना केवळ शिक्षणच नव्हे, तर त्यांच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षिततेबाबत जागरूक करणे, हा या मागचा मुख्य उद्देश होता.

या शिबिरासाठी शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाला शाळेतील सर्व महिला शिक्षिकांची प्रमुख उपस्थिती लाभली, ज्यांनी मुलींच्या शंकांचे निरसन करण्यास मदत केली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी आरोग्य विभागाचे आभार मानले.

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सतिश गणपत पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| रेवदंडा ता. अलिबाग | ५१ | ६७-३०-०० | ६७३.०० |

वर नमुद बिनशेती जमिन मिळकतीमधील सतिश गणपत पाटील यांच्या नावे असलेले क्षेत्र ५-००-०० आर.चौ.मी., आकार ५०.०० रु. पैसे पैकी ३-००-०० आर. चौ.मी., या बिनशेती जमिन मिळकतीबाबतचे

दिनांक : १३/०१/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

# सोनगावात ग्राम परिसर स्वच्छता मोहीम

**। रोहा । प्रतिनिधी ।**




सोनगाव येथे स्वच्छता रॅली व ग्राम परिसर स्वच्छता मोहीम उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम सुदर्शन केमिकल लिमिटेड, रायगड जि.प. शाळा सोनगाव व ग्रुप ग्रामपंचायत मढाली खुर्द यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवारी (दि.११) राबविण्यात आला. यावेळी सोनगाव शाळेपासून ते गावापर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली. गावातील परिसराची साफसफाई करून सुक्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात आले. यावेळी सुदर्शन केमिकल सीएसआरचे प्रतिनिधी संग्राम पाटील, सुदर्शन क्लॅरिएंट सीएसआरचे प्रतिनिधी पराग फुकणे, सुनिल दळवी, ग्रामसेविका प्रतिक्षा कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक संतोष धोत्रे, ब्रिजेश भादेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक भोईर, उपाध्यक्ष राधा शेलार, सुशील खांडेकर, अर्चना चव्हाण, सुजाता वाघमारे, राजेंद्र खांडेकर, अनंता जंगम, स्वप्निलबलकावडे, संध्या शेलार, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रमोद खांडेकर, खजिनदार योगेंद्र जाधव, पोलीस पाटील योगेश जंगम, माजी उपसरपंच मेघना शेलार, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद सप्ताहाला सुरुवात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेज, म्हसळा विद्यालयात श्री स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. १२ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह साजरा करण्यात येते.

याप्रसंगी पहिल्या दिवसाचे पुष्प गुंपण्यासाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक एकनाथ पाटील यांनी आपल्या मनोगतात अथांग परिश्रमामुळे गरिबीवर मात करून यशाची गोड फळे प्राप्त होतात, असा संदेश दिला. त्याचबरोबर कार्यक्रमाच्या प्रमुख स्थानी न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा विद्यालयाचे चेअरमन समीर बनकर यांनी आपल्या मनोगतात स्वामी विवेकानंद या महान समाजसुधारकांनी भारतीय हिंदू संस्कृती सातासमुद्रापलीकडे नेण्याचे कार्य केले आहे. आपण आपल्या हिंदू संस्कृतीची जपवणूक केली पाहिजे.त्याबरोबर संस्कार जपले पाहिजेत असे सांगितले. या कार्यक्रमानिमित्त विविध विद्यार्थ्यांनी वेगवेगळी वेशभूषा केली होती. यामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या वेशमध्ये स्वराज उध्दरकर, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या वेशमध्ये अद्वेत कदम व जिजाऊ यांच्या वेशमध्ये लावण्या साळुंखे आले होते. या कार्यक्रमानिमित्त म्हसळा शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे प्राचार्य डी. आर. पाटील, पर्यवेक्षक जे. के.मांजरेकर ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख देवगावकर, एस. ए. शिर्के, प्राध्यापिका व्ही. एम. जमदाडे, एल. पी. सहारे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दरपत्रक सुचना

कार्यकारी अभियंता हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग कामार्ली, ता. पेण, जि. रायगड या कार्यालयामार्फत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे कार्यालय स्तरावर क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा दि.२०/०१/२०२६ ते २२/०१/२०२६ या कालावधीत रायगड जिल्हा मुख्यालय अलिबाग येथे नियोजित आहेत.

क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेसाठी आवश्यक दरपत्रक सुचना जलसंपदा विभागाच्या wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी दरपत्रके संकेतस्थळावरुन Download करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

सही/-
**(दि.का.राजभोज)**
**क्रिडा नियोजन अधिकारी**
**तथा**
**कार्यकारी अभियंता**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग**
**कामार्ली,**
**ता. पेण, जि. रायगड.**

## निवडक

### राष्ट्रीय युवा दिन साजरा



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभागाच्या वतीने महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. सुरुवातीस जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी यावेळी स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रावर प्रकाश टाकताना भारताच्या युवकांसाठी प्रेरणेचा स्त्रोत म्हणून विवेकानंदांकडे पाहतो, असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या चरित्राचा अभ्यास करून महापुरुषांच्या विचारांचे चिंतन व मांडणी केली पाहिजे, असे प्रतिपादन केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक करून स्वामी विवेकानंदांच्या रामकृष्ण मिशनचे कार्य स्पष्ट केले. तर राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्यावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी प्रकाश टाकला. सुराज्य उभारणीत जिजाऊंचे योगदान विशद केले. यावेळी आयक्युऐसी कॉर्डिनेटर डॉ.ए.आर. चव्हाण, सहयोगी प्राध्यापक व्हि. एस. इंदुलकर, कार्यालयीन अधीक्षक तानाजी घ्यार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### हळदीकुंकू समारंभातून हिंदू जनजागृती

**रसायनी :** रसायनी परिसरातील आंतरराष्ट्रीय बजरंग दल शाखा सावळे, यांच्यावतीने महिला हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नेरूळ येथील हिंदू जनजागृती समितीच्या प्रवीणा पाटील, लीना गडकरी, सुचिता जोशी, तसेच आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन दादा मालुसरे, गोरक्षा विभाग अध्यक्ष मलेश गुडसे, खालापूर तालुकाध्यक्ष प्रशांत तांबोळी, वावेघर विभाग उपाध्यक्ष रविंद्र गायकवाड, रवि ठाकूर आदी उपस्थित होते. यावेळी प्रवीणा पाटील यांनी हिंदू सण, हिंदू संस्कृती, लव जिहाद, महिलांवरील अत्याचार, नाम साधना या विविध विषयावर महिलाना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरिता सावळे गावातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. तसेच ग्रामस्थ सिताराम माळी, मधुकर दळवी, रेखा साळुंखे यादेखील उपस्थित होत्या. यावेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या दुर्गा वाहिनी रसायनी सावळे विभागाच्या प्रमुख म्हणून करुणा क्रांतिश्याम गाताडे यांची नियुक्ती करण्यात आली.



### प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात

**तळा :** डॉ. विनय दत्तात्रय देशमुख सार्वजनिक वाचनालय, तळा येथे मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण सोहळा तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विद्यामंदिर, तळे येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेत इयत्ता पहिलीतील सुजल सुमेध गायकवाड यांनी द्वितीय क्रमांक, श्लोक भरत कोळेकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता दुसरीतील श्रीनीती श्रीनिवास तळकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता तिसरीतील योगेश शिर्के यांनी प्रथम क्रमांक, निमिष निलेश सोमण यांनी द्वितीय क्रमांक तर इयत्ता चौथीतील कुमार विनीत विठोबा मुर्तुंगे यांनी द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. प्रमाणपत्र वितरण संस्थेचे उपाध्यक्ष तसेच प्राथमिक विभागाचे चेअरमन पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षण तज्ञ प्रकाश गायकवाड, समिती सदस्या शारदा केतकर, ज्योती गायकवाड, अतिका रहाटविलकर उपस्थित होते. कार्यक्रमास प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, आत्मविश्वास व स्मरणशक्ती वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

### माजी विद्यार्थ्यांची स्नेहपूरक भेट



**पाली/गोमाशी :** शारदा विद्या मंदिर पेडलीच्या सन १९९७-९८ मधील १० वीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा विळा भागाड गुरुकृपा रिसॉर्ट येथे रविवारी (दि.११) साजरा करण्यात आला. या स्नेहपूरक मेळाव्यानिमित्त २८ वर्षांनी मित्र मैत्रिणी एकत्र आले होते. या मेळाव्यासाठी मुंबई, पुणे, इंदापूर, लोणावळा तसेच गावावरून मित्रमंडळी आली होती. एकमेकांना खूप वर्षातून भेटले याचा सगळ्यांना खूप आनंद झाला होता. स्नेहपूरकभेटी दरम्यान शाळेतील शिक्षिका, शिक्षक तसेच मित्र जे हयात नाहीत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रत्येकाने आपआपली ओळख करून देऊन शाळेतील आठवणींना उजाळा देत मजेशीर किस्से सांगितले. विद्यार्थी दशेतील गंमतीदार आठवणींचा आनंद लुटला. यापुढे देखील असेच पुन्हा एकत्र भेटून एकमेकांच्या सुखदुःखात सामील, होऊ असे यावेळी ठरविण्यात आले.

# संच मान्यता अंतिम टप्प्यात

## ऑनलाईन माहितीची पडताळणी युद्धपातळीवर सुरू



**| रायगड | प्रतिनिधी |**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संच मान्यतेसाठी लागणारी माहिती ही यू-डायस प्लस पोर्टलवर उपलब्ध असलेल्या नोंदींवर आधारित राहणार आहे. ही संच मान्यता अंतिम करण्यासाठी विद्यार्थ्यांची आकडेवारी ही यू-डायस तर शिक्षकांची माहिती ही शालार्थ प्रणालीवरून घेण्यात आली आहे. गुरूजींची पदे राहणार की जाणार यासाठी संच मान्यता महत्वाची असून सध्या ही माहिती अंतिम करण्याचे काम सुरू आहे. साधारण १५ जानेवारीपर्यंत संच मान्यतेवर अखेरचा हात फिरवला जाणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

यंदा शिक्षण विभागाकडून शाळांना एक महत्त्वाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यापूर्वी सरल पोर्टल आणि यू-डायस प्लस पोर्टल या दोन्ही ठिकाणी स्वतंत्रपणे माहिती भरावी लागत होती. मात्र आता ही प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून सर्व आवश्यक विद्यार्थी माहिती फक्त यू-डायस प्लस पोर्टलवरच नोंदवावी लागेल. ३० मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पुढे संच मान्यतेसाठी लागणारी माहिती देखील केवळ यू-डायस प्लस पोर्टलवर उपलब्ध असलेल्या नोंदींवर आधारित राहील.

यंदाची संच मान्यता अंतिम करतांना विद्यार्थी संख्या विचारात घेतांना ३० सप्टेंबर २०२५ अखेर पटावर असलेल्या आधार वैध विद्यार्थी संख्येवरच विचार करण्यात येणार आहे. तसेच या तारखेनंतर आधार पडताळणी पूर्ण केलेले विद्यार्थी किंवा नव्याने झालेल्या नोंदी संच मान्यता किंवा दुरुस्ती प्रक्रियेसाठी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. संच मान्यतेच्या वेळी ३० सप्टेंबरअखेर पटावर असलेला प्रत्येक विद्यार्थी योग्य वयानुसार संबंधित वर्गात दाखल झाला आहे याची खात्री करून घेण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी संच मान्यतेच्या अनुषंगाने पटावरील सर्व विद्यार्थी नोंदींची आधार पडताळणी पूर्ण करावी, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**यंदा शिक्षक अतिरिक्त ?**

जिल्ह्यात यंदा प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा अंदाज शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होतांना दिसत असून त्याचा परिणाम संचमान्यतेवर होणार असल्याने जिल्ह्यात शिक्षकांची पदे धोक्यात येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शिक्षण विभागाच्या पुणे येथील कार्यालयाकडून आलेल्या संचमान्यतेची माहिती जिल्ह्यात तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांच्या पातळीवर पडताळणी करण्यात येत आहे. संबंधीत माहिती ही ऑनलाईन असल्याने पडताळणी झाल्यावर पुन्हा पुणे येथील कार्यालयाला कळवल्यावर संच मान्यतेला मान्यता दिल्यावर जिल्ह्यातील शिक्षकांच्या पदाची संख्या समोर येणार आहे.



# मोहोपाडा थांब्याजवळ वाहतूक कोंडीचा विळखा

**| रसायनी | प्रतिनिधी |**

मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील मैदान ते वीजवितरण कार्यालय या रस्त्यावरील दोन्ही बाजूंचे अतिक्रमण, रस्त्यालगतच्या हातगाड्या यामुळेच दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे नागरिक हैराण झाले आहेत. याची गंभीर दखल घेत रसायनी पोलीस प्रशासनाने कडक कारवाई सुरू केली आहे.

मोहोपाडा परिसरातील मुख्य बाजारपेठेत बेकायदेशीर पार्किंग, रस्त्यावर उभ्या केलेल्या हातगाड्या, तसेच वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन यामुळे सतत ट्रॅफिक जाम होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पोलिसांनी विशेष वाहतूक मोहीम राबवून बेकायदेशीररीत्या उभ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाल्यांना हटवून रस्ता मोकळा करण्यास सुरूवात केली आहे. दुचाकी व चारचाकी वाहनचालकांवर चलन काढण्यात आले. यावेळी पोलीस प्रशासनाने सांगितले की, ही कारवाई केवळ एकदाच न होता सुरू राहणार आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## निवडक



### ‘विद्यार्थ्यांनो, हसतखेळत जगा’

**उरण :** कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा आणली. मी सुद्धा रयतचा विद्यार्थी आहे, आपल्याच महाविद्यालयात पदवीधर झालो. त्याकाळी प्रवासासाठी एसटी हे एकमेव साधन होते. तासा-दोन तासांनी येणारी एसटी पहाटे भाजीपाला विकायला नेणाऱ्या गावकऱ्यांनी बऱ्याच वेळा भरलेली असे. त्यामुळे आमच्या शेलघर बस थांब्यावर बस थांबली नाही, तर गव्हाण फाटा येथे चालत जाऊन दुसरी बस पकडावी लागत असे. शेतीच्या कामांत लावणी, कापणी, डोक्यावर भाताचे भारे वाहून ते उडव्यावर रचणे ही कसरत असायची, त्यानंतर भाताची झोडणी करताना हात लालेलाल व्हायचे, जेवता येत नसे इतपत, पण अपार कष्ट आणि शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या आई-वडिलांच्या शिकवणीने माझा पाया भक्कम झाला, असे मला वाटते. रयत मुळेच मी आज जगाच्या कामगार क्षेत्रांत लीलया वावरतोय. त्यामुळे रयतचा मी कायम ऋणी आहे. त्यामुळेच रयतला मी सढळ हाताने देणगी देतो, ते माझे कर्तव्य आहे. त्यामुळे महाविद्यालय राबवित असलेली श्रम संस्कार शिबिर ही कल्पना उत्तम आह, असे महेंद्र घरत यांनी सांगितले.

### पालीवालामध्ये स्नेहसंमेलन संपन्न

**पाली :** शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय पाली येथे दि ५ ते ९ जानेवारी दरम्यान क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट सांस्कृतिक, क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा व उत्कृष्ट उपक्रमांचा गुणगौरव सोहळा शनिवार (दि.१०) जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या पारितोषिक वितरण सोहळ्याचे मुख्य अतिथी मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे संचालक, बाजीराव मस्तानी फिल्म फेम, प्रसिद्ध लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे उपस्थित होते, त्याचबरोबर सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा, सेक्रेटरी ग. रा. म्हात्रे, संचालक रमेश साळुंखे, हर्षा चांदोरकर, तृप्ती मराठे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपल्या सुप्त कलागुणांचा विकास कसा साधावा याचे प्रात्यक्षिक डॉ. गणेश चंदनशिवे यांनी गोंधळ, भारुड व पोवाडा यांचे सादरीकरण करून केले. बाजीराव मस्तानी चित्रपटासाठी केलेल्या पार्श्वगायनाच्या अनुभवांद्वारे विद्यार्थ्यांना सृजनशीलतेचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्याच्या सृजनशील व बहारदार सादरीकरणामुळे या सोहळ्यात उत्साहाची लाट पसरली व कार्यक्रमाला विशेष उंची मिळाली. सुएसोच्या अध्यक्षा गीता पालरेचा व प्राचार्य डॉ सुधाकर लहुपचांग यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विविध परीक्षा, स्पर्धा व कार्यक्रमांमध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन यावेळी गौरव करण्यात आला.प्रा. डॉ अंकुश सोहनी व प्रा. ज्ञानेश्वर मुंढे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तर प्रा. संतोष भोईर, प्रा. राकेश शिर्के यांना नेट सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



### ‘तरूणांमुळे देश बलशाली बनणार’

**खांब :** निर्व्यसनी तरूणांमुळे देश अधिक बलशाली बनतो, अशाप्रकारे मार्गदर्शनपर मनोगत कोलाड पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या जयंती निमित्त आयोजित अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी कोलाड पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार नितीन गायकवाड, महिला पोलीस हवालदार एस.आर.बांद्रे, दिक्षा म्हशीलकर, मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वप्रथम माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून व पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# कळवेमध्ये रंगले कविसंमेलन

**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण मराठी साहित्य परिषद पेण शाखेचे पोपटी कवि संमेलन कळवे या गावी शेतामध्ये प्रसन्न वातावरणात साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.एल. बी यांनी जिल्ह्यात झालेल्या पोपटी संमेलनात केंद्रीय प्रतिनिधी गणेश कोळी, सुरेश वाजेकर, बळीराम भालेकर आणि लवेंद्र मोकल यांच्या योगदानाचे भरभरून कौतुक केले.

यावेळी रायगड कोमसाप कोषाध्यक्ष ॲड.गोपाळ शेळके, ज्येष्ठ कवी म.वा.म्हात्रे, नाटककार चंद्रकांत पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, एस.एस.पाटील इत्यादी प्रमुखांची उपस्थिती होती. दीप प्रज्वलनानंतर पोपटीची सुगंधी शेतमळ्यातील चव कवी आणि उपस्थित प्रेक्षकांना मनसोक्त घेता आली. पोपटीचा आनंद घेताघेता म. वा.म्हात्रे, सदानंद ठाकूर, संतोष जोहेकर, म. का. म्हात्रे, अजय शिवकर, रामनाथ पेंटर, डी. एल.पाटील, मोहनलाल म्हात्रे, जनार्दन सताणे, न.ग. पाटील, मनोज म्हात्रे, नरेश पाटील, संतोष ठाकूर, गणेश पाटील, नरेश म्हात्रे, लवेंद्र मोकल, गोपाळ शेळके, साहित्यरत्न प्रा. एल.बी.पाटील इत्यादी कवींनी दर्जेदार कविता सादर करून पोपटीला रंगत आणली.

विशेष म्हणजे पोपटी, दारू, नीतीअनिती, प्रेम, सामाजिक प्रश्न, दूषित राजकारण, पोवाडा, शिवाजी महाराजांच्या जीवन विषयक कवितांनी भारावून टाकणारे वातावरण निर्माण केले.त्यानंतर उपस्थितांनी शेतमळ्यातील स्वादिष्ट जेवणाचा आनंद घेत काव्यसंमेलनातील गप्पा रंगवल्या.

# रोहा येथे आरोग्य शिबीर उत्साहात

**माणगाव :** वैश्यवाणी सेवा संघ याच्या वतीने सुतारवाडी येथील द.ग तटकरे विद्यालयात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध



त्वचारोग तज्ञ डॉक्टर डी.जी. सापले यांच्या हस्ते व अध्यक्ष रघुनाथ कोदे तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या शिबिरामध्ये स्रीरोग, बालरोग, हृदयविकार, त्वचा रोग, नेत्र रोग या रोगांची तपासणी करण्यात आली. शिबिरात तज्ञ डॉक्टर सहभागी झाले होते. यावेळी जिल्हातील हजारो नागरिकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घेतला.


### विजय विकास सामाजिक संस्था साकारणार

# लोकनेते दि.बा. पाटील स्मृतीवन

**| उरण | प्रतिनिधी |**

दि. बा. पाटील यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून उरण येथील विजय विकास सामाजिक संस्थेच्या वतीने हजारो वृक्षलागवडीतून निसर्गसेवेतून लोकनेते दि. बा. पाटील स्मृतीवन साकारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. याबाबत संस्थेनी उरण वनविभाग, स्थानिक आमदारांना निवेदन पत्र देवून स्मृतीवनासाठी आवश्यक जागेची मागणी केली आहे. उरण तहसिलदार, जिल्हाधिकारी, विभागीय वनअधिकारी अलिबाग यांनाही निवेदन पाठविण्यात आले आहे.

विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोईर यांनी सांगितले की लवकरच राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांची भेट घेवून स्मृतीवनाचा



संकल्प आराखडा सादर करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संबधित विभागाशी पाठपुरवठा करून दिबांचे स्मृतीवन प्रकल्प येत्या २४ जून रोजी दिबांच्या पुण्यस्मरण दिनी वृक्षरोपणास सुरूवात करण्यात येईल.

ते पुढे म्हणाले की, दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून साकारण्यात येणाऱ्या स्मृतीवनात सर्व प्रकारची स्थानिक देशी झाडांचा समावेश असणार आहे. हे स्मृतीवन पक्षी प्रेमींसाठी लाभदायक ठरेल. स्थानिक जैवविविधतेच्या संवर्धनासाठी अधिक परिश्रम घेतले जातील. तसेच पर्यटनयुक्त निसर्ग सौंदर्याने नटलेले असे स्मृतीवन असेल असे थोडक्यात मत व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांना दिला सुरक्षेचा मंत्र

**नवीन पनवेल :** रस्त्यांवरील वाढते अपघात आणि नियमांचे होणारे उल्लंघन याला चाप लावण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेने आता कंबर कसली आहे. केवळ दंड आकारून नव्हे, तर सुजाण नागरिक घडवून बदल घडवण्याच्या इराद्याने के.ए. बांठिया हायस्कूल, नवीन पनवेल येथे वाहतूक पोलिसांनी जनजागृती कार्यक्रम राबवला. या कार्यक्रमाद्वारे इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या मनात रस्ते सुरक्षेचे बीज रोवण्यात आले. यावेळी बडगुजर, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, तुकाराम कदम, एएसआय तायडे, पो. हवा येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, अभिमन्यू लाळगे, अंकुश ओंबाशे, केशव निकम, महेश बोरकर यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम समजावून सांगितले.

# डॉ. गणेश ठाकूर यांचा कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालायचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. गणेश ठाकूर यांना शैक्षणिक क्षेत्रातील बहुमूल्य योगदानासाठी यावर्षीच्या राज्यस्तरीय कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकतेच अलिबाग येथे संपन्न झालेल्या भव्यदिव्य समारंभात त्यांना आमदार जयंत



पाटील व आमदार भाई जगताप यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांचा आधीही अनेक सन्मानाच्या पुरस्कारांनी गौरव झालेला आहे. रयत शिक्षण संस्थेने प्रबोधनकार ठाकरे उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचा गौरव केला आहे. देशातील सर्वात जुने व जागतिक कीर्तीच्या मुंबई विद्यापीठानेही आपल्या १६५ वर्षांच्या कारकिर्दीत सर्वप्रथम सुरु केलेल्या उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराचेही ते पहिले मानकरी ठरले आहेत. याशिवाय रायगडभूषण व कोकणरत्न यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनीही ते सन्मानित झाले आहेत. या पुरस्काराचा स्वीकार केल्यानंतर आपल्यावर होणाऱ्या कौतुकाच्या वर्षावाला प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, मला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या महाविद्यालयातील सर्व घटकांना मिळालेला सन्मान आहे. हे माझे एकट्याचे यश नसून माझ्या महाविद्यालातील सर्वांचे आहे.

# माणगाव येथे भव्य रक्तदान शिबीर

**| माणगाव | प्रतिनिधी |**

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या प्रेरणेने आणि जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या वतीने माणगाव शाखेत जीवनदान महाकुंभ २०२६ अंतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरास श्री संप्रदायाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष, संप्रदायाचे सर्व पदाधिकारी तसेच ओम रक्तपेढी, पुणे यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. या शिबिरात माणगाव येथील जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संप्रदायातील सेवकवर्गासह अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले. सामाजिक बांधिलकी जपत हे शिबीर यशस्वीपणे पार पडले.

# नेरे येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**नवीन पनवेल :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून हिंदी विद्या प्रचार समितीचे लॉ कॉलेज, घाटकोपर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) शिबिराच्या निमित्ताने शांतीवन, नेरे येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश अभिव्यक्ती बडगुजर, द्वितीय दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), पनवेल या उपस्थित होत्या.

त्यांनी कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसमोर भविष्यात उभ्या राहणाऱ्या आव्हानांचा सखोल आढावा घेत, कोणती कृतीशील व सकारात्मक पावले उचलणे आवश्यक आहे याबाबत विविध उदाहरणांच्या साहाय्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मधुरा कलमकर, ॲड. स्वाती सोनवणे, ॲड. दिपाली बोहरा, पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

### स्थलांतराचे घोडे अडले तरी कोठे? नागरिकांमध्ये पसरला नाराजीचा सूर

# तळा डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सुटेना

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा शहरातील डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न सुटता सुटत नसल्याचे चित्र पहायला मिळत असून कित्येक वर्षांपासून डम्पिंगचे स्थलांतर होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र डम्पिंग ग्राऊंड स्थलांतराचे घोडे अडले तरी कोठे असा प्रश्न आता शहरातील नागरिकांकडून विचारला जात आहे.

तळा नगरपंचायतीने डम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था मालकीच्या तळा धरणाजवळ केली आहे. शहरातील सर्व गोळा केलेला ओला व सुका कचरा एकत्रित या ठिकाणी टाकला जातो.मात्र



या डम्पिंग ग्राऊंड सभोवती संरक्षक भिंत न बांधल्यामुळे मोकाट गुरे,कुत्रे व पक्षांनी तो पसरला जात आहे.यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते जवळच तहसिल कार्यालय असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच डम्पिंग ग्राऊंड शेजारीच निम्म्या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बोअरवेल मारण्यात आली आहे. डम्पिंग ग्राऊंडवर टाकलेला हा कचरा कुजून घाण पाणी जमिनीत मुरले जात आहे. त्यामुळे याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर शहरातील आंबेळी येथे नगरपंचायतीच्या मालकी हक्क असलेल्या जागेत होणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगितले गेले होते.

त्यानुसार त्या ठिकाणी काम ही पूर्ण करण्यात आले आहे.मात्र त्या ठिकाणी डम्पिंगला राणेची वाडी व अंबेळी ग्रामस्थांच्या असलेल्या विरोधामुळे अद्यापही धरणा शेजारीच शहरातील कचरा टाकण्यात येत आहे.यामुळे तळा शहरातील कचऱ्याची समस्या बिकट होत चालली आहे.

> “ डम्पिंग ग्राऊंड सध्या धरणाशेजारी असून ते अंबेळी येथे स्थलांतरित करण्यात येणार आहे.अंबेळी येथे नवीन डम्पिंग ग्राऊंडचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करून फेब्रुवारी अखेर पर्यंत शहरातील कचऱ्याचे अंबेळी येथे विघटन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.जुने डम्पिंग ग्राऊंड आहे तेथीलही संपूर्ण कचरा अंबेळी येथे हलविण्यात येणार असून कचऱ्याचे संपूर्ण विघटन याप्रमाणे काम चालणार आहे.
> **मनिषा वजाळे, मुख्याधिकारी** ”

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- विकणे आहे : अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- किहीम-चोंढी येथील हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Cook-Waiter-Helper-etc. 9152990991 Email: csskshirishkar@gmail.com
- नागाव येथे रिसॉर्ट मध्ये कामासाठी मुलगा व जोडपे पाहिजे आहे तरी संपर्क साधावा. मोबाईल नंबर.९३७१७१४५५२/९३७१७१४५५६
- होमस्टे भाड्याने द्यायचे आहे. पत्ता : विजयनगर-वरसोली-नांदे होमगार्ड ऑफिस शेजारी. मो. ७५०७९२९१२८/९४२२४९४५९०
- जागा भाड्याने देणे आहे. चेंढरे अलिबाग येथील स.नं. ८३/२ अलिबाग-चेंढरे बायपास रोड लगत, रॉयल एनफिल्ड शोरूम लगत, पी.एन.पी. शोरूमच्या वरती-बेसमेंट व पहिला मजला सुमारे २५००.०० चौ. फुटाची जागा भाडे तत्वावर देणे आहे. संपर्क : ९८२२०५४७८८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अलिबाग नगर परिषद ता. अलिबाग जि. रायगड
### ई-निविदा सुचना क्रमांक (०८) सन २०२५-२६ (पहिली वेळ)

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे कडुन बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुन्यातील निविदा पहिल्यांदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत.

टिप:- वरील निविदे मध्ये (०३) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

दिनांक : १३/०१/२०२६ स्वा/-

**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक सुनिता हरिश्चंद्र कराळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - दहिगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत.**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| २८ | ३ | ०-०७-१०<br>पो.ख. ०-००-२० | ०-०५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:-२,''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) दुर्वास पांडूरंग हिलाल<br>२) शोभा पांडूरंग हिलाल उर्फ शोभा योगेश खारीक<br>३) शांताबाई पांडूरंग हिलाल | २६ | ४/अ | ०-०२-०० | ०.०३ |
| | २४ | ७ | ०-१०-६० | १.२५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १३/०१/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

## जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या जाहीर हरकत नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नं. ४४ हिस्सा नं. २/अ/१ या मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी श्री. हरिश्चंद्र अनंता राऊत यांचे नावे असलेल्या ०.०६.२४ क्षेत्राच्या मिळकतीमध्ये राधाबाई लक्ष्मण साळोखे उर्फ गुंजिबाई भिकाजी गायकर हिचा हक्क व हिस्सा असल्याने तिच्या मृत्युचे पश्चात तिचे वारस म्हणुन आमचे अशिल श्री. दिलीप हरिभाऊ गायकर यांचा वारसा हक्क आहे. सदर मिळकतीबाबत श्री. हरिश्चंद्र अनंता राऊत यांनी आमचे अशिलांस आवश्यक ते दस्तही लिहुन दिलेले आहेत. मात्र अशी परिस्थिती असताना श्री.हरिश्चंद्र अनंता राऊत हे सदर मिळकतीमधील आमचे अशिलांचा वारसा हक्क डावळुन सदर मिळकत आमचे अशिलांचे अपरोक्ष इतर कोणासही हस्तांतरण करणेची शक्यता असल्याने सदर मिळकतीचे विक्रीस वा हस्तांतरणास आमचे अशिल श्री. दिलीप हरिभाऊ गायकर, रा. पाली - नवी वसाहत, ता. कर्जत, जि. रायगड यांची सक्त हरकत आहे.

वास्तविक सदर क्षेत्राबाबत श्री. हरिश्चंद्र अनंता राऊत यांचा काहीही संबंध राहिलेला नाही परंतु सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्या सदरी श्री. हरिश्चंद्र अनंता राऊत यांचे नावाची नोंद आहे याचा गैरफायदा घेवून ते सदर मिळकतीमधील त्यांचे नावे असलेल्या क्षेत्राची मिळकत त्रयस्थ इसमांस विकणेची शक्यता असल्याने सदर मिळकतीबाबत श्री. हरिश्चंद्र अनंता राऊत यांचेशी कोणीही कोणतेही विक्री व्यवहार करु नयेत. अन्यथा भावी खरेदीदार तसेच सर्व संबंधितांविरुद्ध आमचे अशिलांस कायदेशीर कारवाई सुरु करणे नाईलाजाने भाग पडेल. तसेच सदर तथाकथित विक्री व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
''श्री सद्गुरु कृपा'', १४४ अ,
मु. पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. नं. ९८६०६२६२४६.

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल अजय अतुल शाह हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक जगदिश प्रभाकर लवेकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे वावे त. आसरे; तालुका सुधागड, जिल्हा रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|
| २९/२/अ | २-६७-०० पैकी यांच्या हिस्साचे<br>क्षेत्र ०-६०-०० पैकी ०-२४-० | ०-६२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १३/०१/२०२६
ठिकाण- पाली सुधागड

सही /-
**ॲडव्होकेट तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल
अन्नपूर्णा, जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन ४१०२०५
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस नोटीसीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, मौजे कळंब, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल श्री. एकनाथ मोरेश्वर शेलार यांना कायमस्वरूपी मालकी हक्काने खालील नमुद मिळकत खरेदीखताने विकत घेत आहेत.
मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः

| जमिन मालकाचे नाव | स.न. | हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री. दिनेश शिवाजीराव घाडगे | ९७ | १ | ०-५१-५० | रू.५.७५ |
| श्री. दिनेश शिवाजीराव घाडगे | ९८ | ५ | १-०५-९० | रू.५.५० |
| एकुण | | | १-५७-४० | रू.११.२५ |

सदर होत असलेल्या कायदेशिर विक्रीला जर अन्य कोणीचीही कायदेशीर हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. सबब वरील मिळकत संदर्भात कोणाचाही गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्कहितसंबंध असल्यास हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाची हरकत न असल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजले जाईल. मागाहुन आलेल्या कोणत्याही हरकती अमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळवावे.
टिप : विद्यमान जमिन मालक यांच्याकडून योग्य ती एन.ओ.सी. घेतली आहे.

सही/-
**ॲड. प्रदीप शिवाजी भोईर**
पताः सदनिका क्र.१०२, क्यु विंग,
फेज-२ मोहन पामस्, बदालापुर पुर्व
पिन कोड - ४२१५०३.
मो.नं.७२७६०६५१८४/९५१८९१२२२१

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी, मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संदीप रमेश फाटक व इतर यांसकडून खालील नमुद केलेल्या मिळकती कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १. | धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड | ३१२ | १७४०.१० |
| २. | धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड | ३१५ | ५७१.१० |

सदर मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती या निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतींसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दि.१२/०१/२०२६

**ॲड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु. सांबरी, पो. कुर्डुस,
ता.अलिबाग, जि. रायगड.

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे:

**अनु क्र. 1, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात एसएसई/वर्क्स/विलवडे सेक्शन अंतर्गत स्थानकांवर टॅक्टाईल टाइल्स बसविण्याचे काम. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यू/टॅक्टाईलव्हीआयडी/41 दिनांक: 13/01/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 26,40,766.81/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 20/01/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 03/02/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने.

**अनु क्र. 2, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात एसएसई/वर्क्स/चिपळूण सेक्शन अंतर्गत स्थानकांवर टॅक्टाईल टाइल्स बसविण्याचे काम. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यू/टॅक्टाईलसीएचआय/45 दिनांक: 13/01/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 10,39,959.07/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 20/01/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 03/02/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने.

**अनु क्र. 3, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात एसएसई/वर्क्स/माणगाव सेक्शन अंतर्गत स्थानकांवर टॅक्टाईल टाइल्स बसविण्याचे काम. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यू/टॅक्टाईलएमएनआय/46 दिनांक: 15/01/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 14,43,243.73/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 22/01/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 05/02/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने.

**अनु क्र. 4, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागात एसएसई/वर्क्स/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत स्थानकांवर टॅक्टाईल टाइल्स बसविण्याचे काम. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यू/टॅक्टाईलआरएन/47 दिनांक: 15/01/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 13,39,210.07/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 22/01/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 05/02/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 6 महिने.

हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. / हि.क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | उलवे ६२३ | गव्हाण २३६ | ३८९/५ | ०-२६-० | २५० चौ.मी. | भूखंड क्र.१९०, सेक्टर-१७, क्षेत्र - २४८.६८ चौ.मी. | **कै.जनार्दन नारायण कोळी (मयत) यांचे वारस**<br>१)श्री. बद्रीनाथ जनार्दन कोळी<br>२)श्री. चंद्रकांत जनार्दन कोळी<br>३)श्रीमती. कांता मच्छिंद्रनाथ कोकाटे<br>४)श्रीमती. कमलाबाई धर्मा कोळी<br>५)श्रीमती. धनवंती विष्णू कोळी<br>६)श्रीमती. मनिषा राम कोळी<br>७)श्रीमती.त्रिवेणी संतोष जगताप<br>८)श्रीमती. मोहिनी संदीप कडके<br>९)श्री. साईनाथ धर्मा कोळी<br>१०)श्रीमती. श्रध्दा निलेश कोळी<br>११)श्रीमती. आश्रया व्दारकानाथ कोळी<br>१२)श्री. तेजस व्दारकानाथ कोळी<br>१३)कु. चैतन्य व्दारकानाथ कोळी | -- |
| | | | एकूण क्षेत्र | ०-२६-० | | | | |
| २ | द्रोणा-गिरी ९१८ | पागोटे २२३ (I)/ १९८५ -८६ | २०/३<br>२५/१<br>३७-२A<br>५६/७A<br>६४/४A<br>८२/२<br>१०९/८<br>११३/३ | ०-०१-८<br>०-०८-०<br>०-०७-०<br>०-०२-६<br>०-०१-५<br>०-०७-९<br>०-०७-२<br>०-१५-९ | ८०३.३ चौ.मी. पुर्णांकात ८०० चौ.मी. पैकी ७५० चौ.मी. | दि. ०६.०९.२०१९ रोजीच्या संगणकिय सोडतीद्वारे नोड द्रोणागिरी, सेक्टर-५९, भुखंड क्र.४१, क्षेत्र ७५० चौ.मी. हा भूखंड इरादित झालेला आहे. | मुळ भूधारक **कै. शांताराम चांगु पाटील** (मयत) (मृत्यू दि. १७.१२.२००६) यांचे वारस<br>१.श्रीमती. पारुबाई शांताराम पाटील<br>२.श्री. कैलाश शांताराम पाटील<br>वारसदाखला CMA No.३९०/२००८<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३९०/२००८<br>मुळ भूधारक **कै. कालीबाई तुळशीराम बंडा** (मयत) (मृत्यू दि. ०२.१२.१९९५) यांचे वारस<br>१.श्री. दशरथ तुळशीराम बंडा<br>२.श्रीमती प्रभावती रत्नकांत भोईर<br>३.सौ. लता विमल रॉय<br>वारसदाखला CMA No. ३८८/२००८<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३८८/२००८<br>मुळ भूधारक **कै. कमलाकर चांगु पाटील** (मयत) (मृत्यू दि. १६.०६.१९८६) यांचे वारस<br>१. रेणुका कमलाकर पाटील<br>२. आशा सिकंदर मंडळ<br>३. वैशाली कमलाकर पाटील<br>४. प्रियांका कमलाकर पाटील<br>५. कै.विश्वास कमलाकर पाटील मयत<br>वारसदाखला CMA No. ३८९/२००८<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३८९/२००८<br>**कै. विश्वास कमलाकर पाटील (मयत)** (मृत्यू दि. २९.०६.१९९८) यांचे वारस<br>१.रेणुका कमलाकर पाटील<br>२.आशा सिकंदर मंडळ<br>३.वैशाली कमलाकर पाटील<br>४.प्रियांका कमलाकर पाटील<br>वारसदाखला CMA No. ३/२००२<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ३/२००२<br>**कै. नारायण चांगु पाटील (मयत)** (मृत्यू दि. ११.०९.२०२३) यांचे वारस<br>१.श्रीमती. नर्मदा नारायण पाटील<br>वारसदाखला CMA No. ७१/२०२४<br>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७१/२०२४ | -- |
| | | पागोटे ९० (i) | ५९/९ | ०-१४-४ | | | | |
| | | पागोटे ९० (i) | १२/३ | ०-२५-५ | | | | |
| | | | **एकुण क्षेत्र** | **०-९१-८** | | | | |
| ३ | खारघर १२१ | खारघर ३६९ | १५५/१९<br>१/३<br>५/२+३<br>५/५+६<br>५/८+९<br>३३४/५<br>१०/३<br>११/५<br>१४/४<br>११/३<br>१७/५<br>१२९/० | ०-०४-०<br>०-१०-७<br>०-१२-०<br>०-४६-६<br>०-११-४<br>०-२०-०<br>०-३३-०<br>०-१४-०<br>०-४१-२<br>०-०४-३<br>०-१७-०<br>०-५९-७ | २९०० चौ.मी. पैकी २५० चौ.मी | भूखंड क्र.३८A, सेक्टर -३५E, क्षेत्र-२५० चौ.मी. | १. हिरा जानू तोडकर<br>२. श्री.शत्रूघ्न जानू तोडकर | मा. दिवाणी न्यायाधिश क्र. स्तर दावा क्र. स्पे.मु.क्र.८१८/२०१२ मधील तडजोड पुरशीसनुसार |
| ४ | | ९०C | १९७/२ब | ०-२३-७ | | | | |
| ५ | | ३९ | २/४+ ६+९/१ | ०-२१-५ | | | | |
| ६ | | १८७ | १२३/२५ | ०-०९-७ | | | | |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **३-२९-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करावयाचे ठिकाण:** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५०% भूमि विभाग
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
**सिडको/जनसंपर्क/४६६/२०२५-२६**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक १) अजय प्रभाकर परांजपे, २) लता परांजपे, विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कळंब ; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|
| ९५/४ | एकूण क्षेत्र ३-२३-०० पैकी लिहून देणार यांच्या हिश्याचे क्षेत्र १-४०-०० | ०-८८ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. १३/०१/२०२६
ठिकाण-पाली सुधागड

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल
अन्नपूर्णा, जांभुळपाडा तालुका
सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक अरविंद पंढरीनाथ म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - सासवणे, तालुका - अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३९०, एकूण क्षेत्र ००-४१-७० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. १०.३०/- पैकी क्षेत्र ००-२०-८५ ( हे.आर.चौ.मी.) खाते क्र. १३२१ साठी सदर जाहीर सूचना देण्यात येत आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/०१/२०२६

**झुंजारराव आणि कं.करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस माहित होणेकरीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की आमचे अशिलांनी खालील नमुद मिळकत विकत घेण्याबाबतचा करार संबंधित मिळकतीचे मालक व ताबेदार यांचे समवेत केलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वेश्वी, ता. उरण, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी | ३९/४ | ०-४५-३०<br>पो.ख. ०-०२-८०<br>०-४८-१० | ६.७८ |

सदर मिळकत संबंधित मालक १.श्री अशोक शांताराम कडू, २.श्री. दिगंबर शांताराम कडू, ३. श्री प्रताप शांताराम कडू सर्व रा.वेश्वी, ता.उरण यांचे व्यक्तिगत तसेच संयुक्त मालकीची असून ती मिळकत खरेदीने घेण्याचे आमचे अशिलांनी निश्चित केले आहे. तरी सदर मिळकत वा तिचे कोणत्याही भागावरती कोणाही व्यक्तिचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबेकब्जा इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लिज आदी स्वरूपात असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०८ दिवसाचे कालावधीमध्ये आपल्या हक्क हित संबंधाचे स्वरूप स्पष्ट करून आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी स्वरूपात हरकती रजि. पोस्टाने वा समक्ष भेटून दाखल कराव्यात. तश्या स्वरूपाची कोणत्याही स्वरूपाची हरकत, तक्रार वा दावा मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत तसेच तीवरती कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे विकास वा विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर आलेल्या तक्रारी, हरकती आमचे अशिलांवरती बंधनकारक राहणार नाहीत वा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरण्यात येईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

उरण
दिनांक :१३/०१/२०२६

सही/-
**ॲड. प्रदीप नारायण पाटील**
बी.एस्सी.एल.एल.बी,
नागांव (पाटीलवाडी)
ता.उरण, जि.रायगड
पिन.नं. ४००७०२
मो.नं. ९८६९१०३०२०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# भारतीय संघाची विजयी सलामी

## ।। न्यूझीलंडवर विजयी घोडदौड कायम ।। रोहितचे ६५० षटकार पूर्ण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात तीनसामन्यांचीवनडेसीरिजखेळवली जात असून यातील पहिला सामना रविवारी ११ जानेवारी रोजी वडोदरा स्टेडियमवर खेळवला गेला होता. या सामन्यात भारताचा कर्णधार शुभमन गिलने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यावेळी न्यूझीलंडने प्रथम फलंदाजीसाठी मैदानात येऊन ८ विकेट्स गमावून ३०० धावा केल्या, आणि भारताला विजयासाठी ३०१ धावांचे आव्हान दिले होते. हे आव्हान भारतीय संघाने ४ विकेट्स राखून पूर्ण केले. आणि सीरिजमध्ये १-० ने आघाडी घेतली आहे.



वडोदराच्या कोटांबी स्टेडियममध्ये पुरुष क्रिकेट संघाचा हा पहिला वनडे सामना रविवारी खेळवण्यात आला. दुपारी १ वाजता भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांच्या कर्णधारांमध्ये टॉस झाला. यावेळी शुभमन गिलने प्रथम गोलंदाजी निवडली. न्यूझीलंडच्या सलामी फलंदाजांनी मैदानात टिकून राहत एकही विकेट न घालवता २१.४ ओव्हरपर्यंत ११७ धावांची कामगिरी केली. यात देवोन कॉनवेने ५६ धावा केल्या तर हेनरी निकोलसने ६२ धावांची कामगिरी केली. या दोघांनंतर न्यूझीलंडकडून सर्वाधिक धावा या डॅरिल मिशेल (८४) ने केल्या. इतर फलंदाजांनी सुद्धा चांगली कामगिरी करून ८ विकेट्स गमावून ३०० धावांची कामगिरी केली. भारतीय संघाचा क्रिकेटर मोहम्मद सिराज, हर्षित राणा, प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. तर कुलदीप यादवला १ विकेट मिळाली.

### भारताचा विश्वविक्रम

वनडे क्रिकेटमध्ये ३०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठण्याचा विक्रम भारताच्या नावावर आहे. या यादीत इंग्लंड दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने १५ वेळा वनडे सामन्यात ३०० पेक्षा जास्त धावांचा पाठलाग केला आहे. या यादीत ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने १४ वेळा हा पराक्रम केला आहे. पाकिस्तान यादीत चौथ्या क्रमांकावर आहे, ज्यांनी १२ वेळा ३०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठले आहे. तर न्यूझीलंड आणि श्रीलंका यांनी ११ वेळा ही कामगिरी केली आहे आणि यादीत ते संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहेत.

भारताकडून विजयाचे आव्हान पूर्ण करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुभमन गिल सलामी फलंदाजीसाठी आले. यावेळी रोहित शर्माने २६, शुभमन गिलने ५६, विराट कोहलीने ९३, श्रेयस अय्यरने ४९, केले राहुलने २९ तर हर्षित राणाने २९ धाव केल्या.

यासामन्यात विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वर्ल्ड रेकॉर्ड बनवत त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८००० धावा पूर्ण केल्या. विराटने सर्वात कमी इनिंग खेळत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ही कामगिरी केली.

याच सामन्यात रोहितने दोन षटकार ठोकत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६५० षटकार पुर्ण केले. त्यामुळे रोहित जगातील पहिला आणि एकमेव खेळाडू ठरला. विशेष म्हणजे आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये रोहित व्यतिरिक्त कोणालाही ६०० षटकारांचाही टप्पा पार करता आलेला नाही. हा टप्पा पार करणारा एकमेव खेळाडू आहे. रोहितचे आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५०६ सामन्यांतील ५३९ डावात ६५० षटकार झाले आहेत.

## निवडक

### ओम नागेश्वर गोमाशी विजयी



**पाली/गोमाशी :** वीरशैव लिंगायत समाज मित्र मंडळ मालगुंड यांच्या वतीने रत्नागिरी, सिधुदुर्ग, रायगड, मुंबई या जिल्ह्यातील लिंगायत समाजाच्या भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन १० व ११ रोजी मालगुंड येथे करण्यात आले होते. स्पर्धेत कोकणातील लिंगायत समाजातील १६ संघांना निमंत्रित करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम लढत ओम नागेश्वर गोमाशी रायगड विरुद्ध शिवमुद्रा ओनी रत्नागिरी या दोन संघात झाली. गोमाशी रायगड संघातील खेळाडूने विरेंद्र जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आपला बहारदार खेळ करत या स्पर्धेतील अंतिम विजयाची मोहर उमटवली. विजयी संघास रोख रक्कम १५ हजार रु व आकर्षक चषक, तर उपविजेता पदाचा मानकरी शिवमुद्रा ओनी रत्नागिरी या संघास रोख रक्कम ११ हजार रु व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक सेव्हन स्टार गुहागर या संघास रोख रक्कम पाच हजार व आकर्षक चषक तर चतुर्थ क्रमांक रत्नागिरी या संघास रोख रक्कम तीन हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू प्रतीक जंगम, उत्कृष्ट चढाई प्रतीक आणि उत्कृष्ट पकड मनोज जंगम यांस आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

### बुद्धिबळ स्पर्धेत निहाल विजयी

**कोलकाता :** प्रतिष्ठित 'टाटा स्टील रॅपिड' बुद्धिबळ स्पर्धेत ग्रँडमास्टर निहाल सरिनने आपल्या प्रगल्भ खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर नाव कोरले. स्पर्धेच्या निर्णायक टप्प्यात महान खेळाडू विश्वनाथन आनंदला बरोबरीत रोखत निहालने



नव्या वर्षाची शानदार सुरुवात केली. विशेष म्हणजे, विश्वविजेत्या डी. गुकेशने स्पर्धेतून माघार घेतल्याने निहालला 'वाईल्ड कार्ड'द्वारे ऐनवेळी पाचारण करण्यात आले होते. या संधीचे त्याने ऐतिहासिक जेतेपदात रूपांतर केले. पहिल्या दिवशी अवघ्या १.५ गुणांसह संथ सुरुवात करणार्या निहालने दुसर्या सत्रापासून आक्रमक पवित्रा घेतला. पुढील सहा फेऱ्यामध्ये त्याने प्रज्ञानंद आणि विश्वनाथन आनंद यांसारख्या दिग्गजांना बरोबरीत रोखत, तर इतर चार फेऱ्यात विजय मिळवत ५ गुणांची कमाई केली. अलीकडेच २,७०० रेटिंग गुणांचा टप्पा ओलांडणार्या निहालने या विजयाद्वारे गुकेश, प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी यांच्यासारख्या समकालीन जागतिक कीर्तीच्या खेळाडूंच्या पंक्तीत स्वतःचे स्थान अधोरेखित केले आहे. दिवंगत आजोबांना विजय समर्पितहे जेतेपद निहालसाठी भावनिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरले.




### बार्सिलोनाने जिंकला 'स्पॅनिश कप'

**जेद्दाह :** बार्सिलोनाने स्पॅनिश सुपर कप जिंकला आहे. किंग अब्दुल्ला स्पोर्ट्स सिटी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या रोमांचक अंतिम सामन्यात, बार्सिलोनाने रिअल माद्रिदचा ३-२ असा पराभव करुन विजेतेपद पटकावले. बार्सिलोनासाठी रॅफिन्हाने दोन गोल केले. या विजयासह बार्सिलोनाने त्यांचे १६ वे स्पॅनिश सुपर कप विजेतेपद जिंकले. दोन्ही संघांमधील चुरशीच्या स्पर्धेने सामन्याची सुरुवात झाली. पहिल्या हाफच्या स्टॉपेज वेळेच्या दुसऱ्या मिनिटाला, व्हिनिसियस ज्युनियरने हाफवे लाईनजवळ चेंडू घेतला, पुढे गेला, दोन डिफेंडर्सना ड्रिबल केले आणि एक शानदार सोलो रन नंतर गोल केला, ज्यामुळे स्कोअर १-१ बरोबरीत झाला. मध्यांतराला रिअल माद्रिदने बरोबरी साधली. रफिन्हाने कॉर्नरवरुन गोल-लाइन क्लिअरन्स मिळवला, परंतु गोंझालो गार्सियाने रिबाउंडवर झेप घेतली. चेंडू बार आणि पोस्टवर आदळला आणि नंतर रेषा ओलांडली, ज्यामुळं आघाडी २-२ झाली. ९० व्या मिनिटाला कायलियन एमबाप्पेला फाऊल केल्याबद्दल लाल कार्ड दाखवण्यात आलं, ज्यामुळे बार्सिलोना १० खेळाडूंमध्ये घसरला. रियलनं दबाव वाढवला, परंतु अल्वारो कॅरेरास आणि फ्रँको मास्टंटुओनो यांचे प्रयत्न गोलकीपर जोन गार्सियाने हाणून पाडले.

# मुस्लीम प्रिमिअर लिग स्पर्धेला सुरुवात

## माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक यांची प्रमुख उपस्थिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरातील क्रिडा भवन येथे मुस्लीम प्रिमिअर लिग ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अलिबाग, मुरूड, पेण, व रोहा तालुक्याकरीता मर्यादीत असलेल्या स्पर्धेचे उद्घाटन अलिबागचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक प्रशांत नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि.१२) पार पडला. याप्रसंगी अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेवक अनिल चोपडा, सागर भगत, अभय म्हामुणकर, आदी मान्यवर उपस्थित होते.




स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले आहेत. तीन दिवसीय या स्पर्धेचा आनंद लुटण्यासाठी क्रिडा भवन समोर क्रीडाप्रेमींनी अलोट गर्दी केली होती. क्रिकेट खेळाचा आनंद यावेळी अनेकांनी घेतला. या स्पर्धेतील अंतिम सामन्यानंतर प्रथम क्रमांकाला रोख साठ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला रोख तीस हजार रुपये व चषक व तृतीय क्रमांकाला वीस हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच मालिकावीराला चषक व आणि टीव्ही, उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाज यांना प्रत्येकी एक चषक आणि कुलर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाला चषक आणि शुज देऊन गौरविण्यात येणार आहे. मुस्लीम प्रिमिअर लीग ही क्रिकेट स्पर्धा अलिबागमध्ये पहिल्यांचा भरविण्यात आली आहे. १४ जानेवारीला बक्षीस वितरण समारंभ पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# राष्ट्रीय कुमार कबड्डीची धुरा अतुलकडे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. ने ५१ व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता सोमवारी (दि.१२) जानेवीरी रोजी संघ घोषित केला. त्यात परभणीच्या अतुल जाधवकडे या संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. विजयवाडा, आंध्र प्रदेश येथे दि. १५ ते १८ जानेवारी या कालवधीत ही स्पर्धा होणार आहे. बारामती, पुणे येथे मुंबई उपनगरचे राष्ट्रीय कबड्डी खेळाडू गिरीश पवार याच्या मार्गदर्शनाखाली या संघाचे सराव शिबीर सुरु होते. दि. १४ जानेवारीला एल. टि. टि. - विशाखापट्टनम एक्सप्रेसने विजयावाडा येथे स्पर्धेकरिता रवाना होईल. अशी माहिती व संघाची घोषणा संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांनी केली. निवडण्यात आलेला संघ खालील प्रमाणे.



गट संघ :- १) अतुल जाधव - संघनायक, परभणी, २) साई चौगुले- मुंबई शहर, ३) शुभम बिटके - पिंपरी चिंचवड, ४) अर्जुन धडस - पुणे ग्रामीण, ५) समीर हिरवे - रायगड, ६) शुभम रेपे - कोल्हापूर, ७) वेदान्त कांबळे - रत्नागिरी, ८) तृणाल भुजबळ - पुणे शहर, ९) जीतसिंग सैनी - ठाणे ग्रामीण, १०) रौनक पाटील - ठाणे ग्रामीण, ११) विशाल गोराडे - पालघर, १२) वेदान्त उंदरे - अ. नगर, १३) कुणाल हर्णेकर - पुणे शहर, १४) वेदान्त जाधव - परभणी यांचा संघात समावेश करण्यात आला आहे. तर प्रशिक्षक गिरीश पवार व्यवस्थापक नमोशिवाय पायगण याच्यावर कामगिरी सोपवली आहे.

# नेरळ प्रीमियर लीगमध्ये किंग्सची बाजी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळगावातील क्रिकेट खेळाडूंना वाव मिळावा यासाठी दरवर्षी नेरळ प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन केले जाते. प्रथमेश मोरे यांच्या पुढाकाराने आणि डी ३ ग्रुप यांच्या आयोजनातून तीन दिवसीय नेरळ प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन कोतवालवाडी ट्रस्टच्या मैदानावर करण्यात आले होते. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नेरळ किंग संघाने नेरळ डेअर डेव्हील्स संघाचा पराभव करून विजय मिळविला आणि नेरळ प्रीमियर लीग स्पर्धेचे विजेतेपद मिळविले.




स्पर्धेचे आयोजन कोतवालवाडी ट्रस्टच्या मैदानावर करण्यात आले होते. तीन दिवसीय स्पर्धेचे उदघाटन रोहिदास मोरे, सुनीता मोरे आणि प्रथमेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये नेरळ लायन्स, नेरळ इंडियन्स, नेरळ किंग्स, नेरळ नाईट रायडर्स, नेरळ वॉरियर्स, नेरळ डेअर डेव्हील्स, नेरळ रॉयल चॅलेंजर्स, नेरळ सनराइजर्स, नेरळ सुपर किंग्स आणि नेरळ रॉयल या संघानी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे साखळी पध्दतीने सामने खेळवण्यात आले होते. स्पर्धेसाठी भिवंडी येथून पंच बोलावण्यात आले होते. स्पर्धेचे टेनिस क्रिकेट या यु ट्यूब चॅनेल वरून थेट प्रक्षेपण केले होते. स्पर्धेच्या आयोजनात अक्षय चव्हाण, परेश सुर्वे, उदय मांडे, चेतन गुरव यांच्यासह डी ३ ग्रुपाचा सहभाग होता.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नेरळ किंग्स संघाने प्रथम फलंदाजी करताना पाच षटकात ८० धावांचे लक्ष्य नेरळ डेअर डेव्हील्स संघाला दिले होते, मात्र ते लक्ष्य पार करण्यात नेरळ डेअर डेव्हील्स संघाला यश आले नाही त्यामुळे त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. आणि नेरळ किंग्स संघाने नेरळ प्रिमीयर लीगचे विजेतेपद पटकावले. स्पर्धेत नेरळ रॉयल संघाने तिसरा तर नेरळ इंडियन्स संघाने चौथा क्रमांक मिळविला.स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू रोशन कातकरी याने खिताब पटकावला.तर अंतिम फेरीतील 'मॅन ऑफ दि मॅच' अतिश शिंगवा ठरला. उत्कृष्ट फलंदाज अतिश शिंगवा, उत्कृष्ट गोलंदाज मुस्तकीम खान यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेतील उदयोन्मुख खेळाडू म्हणून आदित्य डायरे यास सन्मनित करण्यात आले. अंतिम विजेत्या संघाला सुनीता मोरे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले होते.

स्पर्धेच्या अंतिम सामन्याला बाजीराव दळवी, बाबू घारे, मधुकर घारे, किरण ठाकरे, बंडू क्षीरसागर, अल्पेश मनवे, प्रज्ञेश खेडकर, अनिल कडू, बंडू टुरडे आदींसह नेरळ गावातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

# अलिबाग सेल्स रायडर विजेता

## अलिबाग तालुका सेल्सतर्फे खानावमध्ये क्रिडा स्पर्धाचे आयोजन






**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुका सेल्स टीमच्या वतीने खानावमध्ये प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत अलिबाग सेल्स रायडर संघ विजेता ठरला असून या संघाला चषक आणि रोख सात हजार रुपये देऊन गौरविण्यात आले.

अलिबाग तालुका सेल्स टीमच्या माध्यमातून गतवर्षापासून प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. याही वर्षी हा उपक्रम अलिबाग तालुका सेल्स टीमच्या वतीने रविवारी (दि.११) खानावमध्ये घेण्यात आला. या स्पर्धेत एकूण आठ संघ सहभागी झाले होते. एक दिवसीय या सामान्याचा आनंद खानाव परिसरातील क्रिडा प्रेमींनी मनमुरादपणे लुटला.

अलिबाग सेल्स रायडर संघ हा अंतिम सामना विजेता तर उपविजेता अलिबाग सेल्स फायटर ठरला आहे. कै. मिताली मिलिंद भालवणकर स्मरणार्थ मिलिंद भालवणकर पुरस्कृत प्रथम आणि द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले होते. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून विशाल म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज म्हणून रोहित राऊत, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून राजेंद्र नगरकर, मालिकावीर म्हणून संकल्प पाटील यांना गौरविण्यात आले. या संपुर्ण स्पर्धेतील सामनावीर म्हणून निकेश भगत, रुपेश गिजे, रोहित राऊत, प्रतिक पाटील, प्रितम भगत, संकल्प पाटील, प्रथमेश थळे, अतुल जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

## महिलांमध्ये पश्चिम बंगाल, हरयाणा, पंजाब विजयी | शुभम, सुयश, रुद्रची उत्तम कामगीरी

# 'खो-खो'त महाराष्ट्राची दिमाखदार आगेकूच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रेल्वे ग्राऊंडवर खेळाडू उतरले आणि मैदानावर अक्षरशः आग ओकली गेली! वेग, चपळाई, अचूक डावपेच आणि अफाट आत्मविश्वास यांचा थरारक संगम अनुभवायला मिळालेल्या ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत पहिल्याच दिवसापासून सामन्यांनी रंगत गाठली. तेलंगना खो-खो असोसिएशनच्या वतीने आणि खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष व महिला संघासह महिलांमध्ये पश्चिम बंगाल, हरयाणा, पंजाब तर पुरुष गटात दिल्ली, छत्तीसगड, विदर्भ, पाँडिचेरी, उत्तरप्रदेश व गुजरात या बलाढ्य संघांनी प्रतिस्पर्ध्यांना धुळ चारत विजयी आगेकूच दिमाखात सुरू ठेवली आहे. डावाने आणि मोठ्या गुणांच्या फरकाने मिळालेले हे विजय आगामी हाय-व्होल्टेज लढतींची नांदी ठरत आहेत.





महिला गटात महाराष्ट्राने छत्तीसगडला ३५-१२ असा १ डाव राखून २३ गुणांनी पराभूत केले. विशेष म्हणजे, महाराष्ट्राचा एकही खेळाडू बाद झाला नाही. मध्यंतराला २८-६ अशी २२ गुणांची आघाडी, दोन्ही डावात मिळून ड्रीमरनचे ७ गुण मिळाले. या विजयात रेश्मा राठोड , सरीता दिवा, अश्विनी शिंदे, प्रियांका इंगळे, मैथिली पवार यांनी चमकदार खेळ केला.

### महाराष्ट्राची 'विजयाची वारी'

महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी **परंपरेला साजेसा आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्ध्यांना सावरण्याची संधीच दिली नाही. पुरुष गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ३१-१६ असा १ डाव व १५ गुणांनी पराभव केला. महाराष्ट्राकडून शुभम थोरात, सुयश गरगडे, रूद्र थोपटे यांनी सलग दमदार कामगिरी करत विजयावर शिक्कामोर्तब केले.**

पुरुष गटात विदर्भाने उत्तराखंडचा २५-१६ असा १ डाव व ९ गुणांनी पराभव करत पुढील फेरीकडे दमदार पाऊल टाकले. विदर्भासाठी फैज पठाण हा विजयाचा शिल्पकार ठरला. त्याला राहुल सहारा आणि यश सदनशिव यांनी भक्कम साथ दिली. महिला गटातील सामन्यात पंजाबने गोव्याचा ३७-४ असा १ डाव राखून ३३ गुणांनी धुव्वा उडवला. पंजाबकडून बांधब कौर, यशदीप आणि स्नेहप्रीत यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. गोव्याकडून अमिषा हिलाच मर्यादित यश मिळाले.

# नंदिनी शर्माने इतिहास रचला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महिला प्रीमियर लीग २०२६ च्या चौथ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सची युवा गोलंदाज नंदिनी शर्माने असे काही साध्य केले जे लीगच्या इतिहासात कोणीही साध्य केले नाही. नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर गुजरात जायंट्स विरुद्ध खेळताना, नंदिनीने केवळ तिची पहिली हॅटट्रिक घेतली नाही तर एकाच सामन्यात पाच विकेट आणि हॅटट्रिक घेणारी जगातील पहिली खेळाडू बनली. चंदीगडची २४ वर्षीय वेगवान गोलंदाज नंदिनी शर्मा हिने रविवार, ११ जानेवारी रोजी गुजरात जायंट्सविरुद्ध तिच्या गोलंदाजीने धुमाकूळ घातला. सामन्याच्या २० व्या षटकात, गुजरात मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल करत असताना,



नंदिनीच्या जादुई गोलंदाजीने सामन्याचा मार्ग बदलला. डावाच्या शेवटच्या षटकात तिने चार विकेट्स घेतल्या आणि शेवटच्या तीन चेंडूत तीन विकेट्स घेऊन हॅटट्रिक पूर्ण केली. नंदिनीने कनिका आहुजा, राजेश्वरी गायकवाड आणि रेणुका सिंग ठाकूर यांना सलग चेंडूंवर बाद करून इतिहासातील तिची चौथी आणि भारतीय खेळाडूची दुसरी हॅट्रिक घेतली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)